
# चरियापिटक



अनुवादक

**डॉ. शेषराव मेश्राम**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स

# चरियापिटक

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई-४०० ०३२

अनुक्रमणिका

**प्रथमावृत्ती** : ऑक्टोबर १९९३.
आश्विन पौर्णिमा.

**प्रकाशक** : **सचिव,**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
नवीन प्रशासन भवन,
मुंबई- ४०० ०३२.

**मुद्रक** : **व्यवस्थापक,**
येरवडा कारागृह मुद्रणालय,
पुणे-४११ ००६.

**किंमत** : **रुपये ३३·००**

**मुखपृष्ठ** : शीतल शहाणे, औरंगाबाद.

## अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

-आचार-प्रभवो धर्मः।॰ ........ ६
ग्रंथ परिचय ........ ८
१. अकित्ति—चरियं (**१ अकीत्ति चर्या**) ........ १२
२. सङ्ख चरियं (२. शंख-चर्या) ........ १४
३. कुरुधम्म-चरियं (३. कुरूधम्म-चर्या) ........ १६
४. महासुदस्सनचरियं (४. महासुदस्सन चर्या) ........ १८
५. महागोविंदचरियं (५. महागोविंद चर्या) ........ २०
६. निमिराजचरियं (६. निमिराज चर्या) ........ २१
७. चन्दकुमारचरियं (७. चंद्रकुमार चर्या) ........ २२
८. सिविराजचरियं (८. शिविराज चर्या) ........ २३
९. वेस्सन्तरचरियं (९. वैइयन्तर चर्या) ........ २६
१०. ससपण्डितचरियं (१०. शशपंडित चर्या) ........ ३५
दुतियो परिच्छेदो/दुसरा परिच्छेद  सीलपारमिता/शील पारमिता ........ ३९
१. सीलवनागचरियं (१. शीलवनागचर्या) ........ ३९
२. भूरिदत्तचरियं (२. भूरिदत्त चर्या) ........ ४१
३. चम्पेय्यनाग चरियं (३. चंपेय्यनाग चर्या) ........ ४३
४. चूलबोधिचरियं (४. चूलबोधिचर्या) ........ ४४
५. महिंसराज—चरियं (५. महिंसराज चर्या) ........ ४६
६. रुरुराज-चरियं (६. रुरुराजा-चर्या) ........ ४८
७. मातङ्ग चरियं (७. मातङ्ग चर्या) ........ ५०
८. धम्मदेवपुत्त—चरियं (८. धम्मदेव पुत्र चर्या) ........ ५१
९. अलीनसत्त-चरियं (९. अलीनसत्त चर्या) ........ ५३
१०. सङ्खपाल-चरियं (१०. शंखपालचर्या) ........ ५५
ततियो परिच्छेदो/तिसरा परिच्छेद  नेक्खम्मपारमिता/नैष्क्रम्य-पारमिता ........ ५७
१. युधञ्जय-चरियं (१. युधञ्जय चर्या) ........ ५७

अनुक्रमणिका

२. सोमनस्स-चरियं (२. सोमनस्स चर्या)........ ५९

३. अयोघर-चरियं (३. अयोघर चर्या)........ ६२

४. भिस-चरियं (४. भिस चर्या)........ ६४

५. सोणपण्डित-चरियं (५. सोणपंडीत चर्या)........ ६६

चतुत्थो परिच्छेदो/चौथा परिच्छेद  अधिट्ठान पारमिता/अधिष्ठान पारमिता........ ६७

१. तेमिय-चरियं (१. तेमिय चर्या)........ ६७

पञ्चमो परिच्छेदो/पाचवा परिच्छेद  सच्चपारमिता/सत्यपारमिता........ ७१

१. कपिराज-चरियं (१. कपिराज चर्या)........ ७१

२. सच्चसव्हयपण्डित-चरियं (२. सत्यसव्हयपंडित चर्या)........ ७२

३. वट्टपोतक-चरियं (३. वट्टपोतक चर्या)........ ७३

४. मच्छराज-चरियं (४. मच्छराज चर्या)........ ७५

५. कण्हदीपायन—चरियं (५. कृष्णद्वैपायनचर्या)........ ७७

६. सुतसोमचरियं (६. सुतसोमचर्या)........ ८०

छट्ठो परिच्छेदो/सहावा परिच्छेद  मेत्तापारमिता/मैत्रीपारमिता........ ८१

१. सुवण्णसाम-चरियं (१. सुवण्णासाम-चर्या)........ ८१

२. एकराज-चरियं (२. एकराज-चर्या)........ ८२

सत्तमो परिच्छेदो/सातवा परिच्छेद  उपेक्खा पारमिता/उपेक्षा पारमिता........ ८३

१. महालोमहंस-चरियं (महालोमहंस चर्या)........ ८३

टीपा........ ८६

# ‘आचार-प्रभवो धर्मः।’

***प्रस्तावना :***

‘हें विश्वचि माझें घर’ ह्या वृत्तीने साऱ्या जगाला सुखी करण्यासाठीं, आपलें घरदार सोडून बाहेर पडलेला बौद्ध-धर्म-संस्थापक गौतम बुद्ध एक महान् युगपुरुष होऊन गेला. त्याचें पुण्य-चरित्र अनेक दैवी गुणांनी मंडित झालें आहे. ‘बहुजन सुखाय, बहुजन हिताय’ हेंच त्याचें ध्येय-धोरण.

गौतमाने यज्ञामधील पशुहत्या, कर्मकांड नि उच्च-नीच भाव ह्या विरुद्ध बंड उभारुन, आणि अहिंसा-सत्य-अस्तेय इत्यादि सात्विक कर्मांचा उपदेश करून, समाजाचा नैतिक स्तर उंचावण्याचे महत्कार्य केले. त्यायोगें मूळचा वैदिक हिंदु धर्महि प्रभावित झाला आणि त्याने त्याचा गौरव ‘नववा अवतार’ म्हणून केला. जयदेव कवीने म्हटलेंच आहे—

**‘निंदसि यज्ञ-विधेरहह श्रुतिजातम् ।**
**सदय-हृदय-दर्शित पशुघातम् ।**
**केशव धृत-बुद्ध-शरीर-जय जगदीश हरे! ॥**

अशा ह्या परम-कारुणिक महात्म्याचा, तत्त्वज्ञानापेक्षांहि सदाचारावरच अधिक भर होता. **‘आचार-प्रभवो धर्मः’**हें त्याने उत्तम जाणलें होते.

ह्या दृष्टीने, आज आमच्या ‘महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति-मंडळा’ तर्फे प्रकाशित होत असलेल्या **‘चरिया-पिटक’**ह्या ग्रंथाचें महत्त्व विशेष आहे.

मूळ पालि-भाषेंतील संहितेचा सुबोध अनुवाद आणि माहितीपूर्ण ‘ग्रंथ-परिचय’ जिज्ञासू अभ्यासकांना वाचावयास मिळेल. समाजाच्या प्रबोधनास उपयुक्त असलेलें हें अवघड कार्य पालि-भाषा-पंडित **डॉ. शेषराव मेश्राम** ह्यांनी मोठ्या साक्षेपाने केलें आहे. डॉ. मेश्राम हे औरंगाबाद येथील ‘मिलिंद-महाविद्यालयां’त गत ३० वर्षे पालि-विभाग प्रमुख असून, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठां’त पालि आणि बौद्ध-दर्शन-विभागाचे प्रभारी प्राध्यापकहि आहेत. पदवी आणि पदव्युत्तर वर्गांना अध्यापन आणि मार्गदर्शन करण्याचा प्रदीर्घ अनुभवहि त्यांच्या गांठीं आहे. त्यांची सुबोध नेटकी शैली, त्यांच्या व्यासंगाची नि अनुभव-संपन्नतेची साक्ष सहज पटवील. महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळातर्फे मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

भगवान् गौतम बुद्धांच्या पूर्व-जन्माच्या ‘चर्यां’चे वर्णन करणारा हा ग्रंथ ‘चरिया पिटक’. चरिया (चर्या) म्हणजे सदाचरण अथवा बोधिसत्वाने करावयाची दैनंदिन कर्तव्यकर्मे. बोधिसत्वाने ह्या ‘चर्यां’ मध्यें-दहा पारमितांमध्यें-पूर्णत्व कशा प्रकारें प्राप्त केलें, हें येथे सांगितले आहे. ‘पारमिता’ ह्या शब्दाचा अर्थच मुळीं ‘पूर्णत्व’ असा आहे. दहा ‘पारमितां’चे यथासांग पालन केल्याविना कोणालाहि ‘बुद्धत्व’ प्राप्त होऊं शकत नाही. ‘दान-शील-नैष्कर्म्य-प्रज्ञा-वीर्य-शांति-सत्य-अधिष्ठान, मैत्री आणि उपेक्षा’, अशा दहा पारमितांमध्ये परिपूर्णत्व प्राप्त करूनच बोधिसत्व बुद्ध होतो. ‘बोधि’,अथवा ‘संबोधि’ म्हणजे परमज्ञान. ‘सत्व’ म्हणजे प्राणी. बोधिसत्व म्हणजे बोधि-प्राप्तीसाठीं प्रयत्न करणारा ‘सत्व’!

अनुक्रमणिका

वर निर्देशिलेल्या १० पारमितांपैकी ‘दान-शील-नैष्कर्म्य-अधिष्ठान-सत्य-मैत्री-उपेक्षा’ ह्या सात पारमितांचीच माहिती प्रस्तुत ग्रंथांत आहे. मानवी दुःखांवर मात करून, मानवाला खऱ्या शाश्वत सुखाचा मार्ग ह्या पारमिता दाखवितात.

असा हा ग्रंथ समाजाची नीतिमत्ता वाढविण्यास आणि अनीतीचा उच्छेद करण्यास, साहाय्यभूत होईल. म्हणूनच, त्याचें प्रकाशन करितांना ‘महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति-मंडळा’स साभिमान आनंद होत आहे. ह्या आनंदास कारणीभूत होणाऱ्या ग्रंथकर्त्यास—डॉ. मेश्राम ह्यांना—मी साहित्य-सेवेंत वाढतें सुयश चिंतितो.

दादर, मुंबई,
दिनांक १ ऑगस्ट १९९६.

***विद्याधर गोखले***
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति-मंडळ.

―――――

## अनुक्रमणिका

# ग्रंथ परिचय

संपूर्ण मानव मात्रांचा दुखःनाशाचा मार्ग शोधून काढण्यासाठी सिद्धार्थ गौतमाने वयाच्या २९ व्या वर्षी 'महाभिनिक्खमन' म्हणजे गृहत्याग केला. ते गयेजवळ उरुवेला येथे आले आणि नेरंजरा नदीच्या जवळ बोधिवृक्षाखाली बसून त्यांनी अत्यंत खडतर साधना सुरू केली. सहा वर्षेपर्यंत खडतर साधना केल्यावर वयाच्या ३५ व्या वर्षी दुःखचा उगम कसा होतो आणि निरोध कसा होतो याचे ज्ञान झाल्यावर सिद्धार्थ गौतम बुद्ध झाले. चार आर्य सत्ये आणि अष्टांगिक मार्गाचे ज्ञान त्यांना झाले. सम्यक् सम्बोधि प्राप्त झाल्यामुळे ते बुद्ध झाले. बुद्धत्व प्राप्तीनंतर ते सारनाथ येथील इसिपत्तन मिगदायात आले. तेथे पंचवर्गीय भिक्खुंना आपल्या धम्माचा उपदेश केला. त्याला तथागताचे पहिले धम्मचक्रप्रवर्तन म्हणतात.

सम्बोधि प्राप्तीपासून महापरिनिब्बाण होईपर्यंत महाकारुणिक तथागत जगातील प्राण्यांच्या कल्याणाकरिता आपल्या धम्ममार्गाचा उपदेश करीत राहिले. आपण शोधून काढलेला मार्ग संपूर्ण विश्वाला सांगायचा आहे अशी त्यांची सुरवातीपासूनच धारणा होती. या कार्यासाठी त्यांनी सुदृढ नियमाच्या पायावर आधारलेला आणि सुव्यवस्थित अशा भिक्खुसंघाची सर्वप्रथम स्थापना केली. जेथे जेथे ते गेले आणि ज्यांना त्यांनी उपदेश केले ते सर्व मौखिक होते. उपदेशाचे वेळी उपस्थित स्मृतीमान आणि बहुश्रुत भिक्खु ते उपदेश पाठ करीत असत. त्यांच्या महापरिनिब्बाणानंतर त्यांनी ४५ वर्षे पर्यंत केलेल्या उपदेशांचा संग्रह करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. तेव्हा ते त्रिपिटकात संग्रहित करण्यात आले. त्रिपिटक म्हणजे तीन पिटक अर्थात तीन पेटारे. हे तीन पिटक पुढीलप्रमाणे आहेत. (१) सुत्तपिटक, (२) विनयपिटक, (३) अभिधम्मपिटक.

यापैकी सुत्तपिटक पाच निकायामध्ये विभागण्यात आले आहे. त्यांची नावे अशी—दीघनिकाय, मज्झिमनिकाय, संयुत्तनिकाय, अङ्गुत्तरनिकाय आणि खुद्दकनिकाय. विनयपिटकाचे विषयानुसार तीन भाग करण्यात आले आहेत. सुत्तविभङ्, खन्धक आणि परिवार. सुत्तविभङ्गचे पाराजिक आणि पाचित्तिय असे दोन भाग आहेत. तसेच खन्धकांचे सुद्धा दोन भाग आहेत—महावग्ग आणि चुल्लवग्ग. अभिधम्मपिटकाचे पुढीलप्रमाणे सात विभाग करण्यात आले आहेत. त्यांची नावे—धम्मसङ्गणि, विभङ्ग, धातुकथा, पुग्गलपव्वत्ति, कथावत्थु, यमक आणि पट्ठान अशी आहेत.

खुद्दक निकायामध्ये पंधरा स्वतंत्र ग्रंथांचा समावेश होतो.—(१) खुद्दकपाठ, (२) धम्मपद, (३) उदान, (४) इतिवुत्तक, (५) सुत्तनिपात, (६) विमानवत्थु, (७) पेतवत्थु, (८) थेरगाथा, (९) थेरीगाथा, (१०) जातक, (११) निद्देस, (१२) पटिसम्भिदामग्ग, (१३) अपदान, (१४) बुद्धवंस आणि (१५) चरियापिटक.

चरियापिटक खुद्दकनिकायातील पंधरावा ग्रंथ आहे. त्यातील चरिया शब्दाचा अर्थ सदाचरण अथवा बोधिसत्वाने करावयाची दैनंदिनी कर्तव्ये असा होतो. पिटक शब्दाचा अर्थ वर सांगितल्याप्रमाणे पेटारा असा होतो. याप्रमाणे चरियापिटक म्हणजे सदाचरणाचा अथवा बोधिसत्वाच्या दैनंदिन कर्तव्याचा पेटारा.

या ग्रंथात भगवान बुद्धाच्या पूर्वजन्माच्या चर्याचे वर्णन आहे. या चर्यामध्ये त्यांनी दहा पारमितामध्ये कशाप्रकारे पूर्णत्व प्राप्त केले त्याचे विवेचन करण्यात आले आहे. पारमिता या शब्दाचा अर्थ पूर्णत्व असा आहे. पालिमध्ये त्याला 'पारमि' असे म्हणतात. पारमिता पूर्ण केल्याशिवाय कोणतीही व्यक्ती 'बुद्धत्व' प्राप्त

करू शकत नाही. अशा पारमिता दहा आहेत (१) दान, (२) शील, (३) नैष्कम्य, (४) प्रज्ञा, (५) वीर्य, (६) शांती, (७) सत्य, (८) अधिष्ठान, (९) मैत्री, आणि (१०) उपेक्षा.

बोधिसत्वाला बोधी प्राप्त करण्याकरिता ह्या पारमिता पूर्ण कराव्या लागतात. त्यासाठी त्याला अनेक जन्म सुद्धा घ्यावे लागतात. या पारमितांचे महत्त्व लक्षात घेऊन आचार्य बुद्धघोष यांनी आपल्या जातक अट्ठकथा ग्रंथांत पारमितांना 'बुद्धकारका धम्मा' असे म्हटले आहे. ह्या पारमिता बुद्धत्व प्राप्त करण्याची साधने आहेत असे सिद्धार्थाला आढळून आले त्यामुळे त्याने या पारमिता पूर्ण केल्या. त्याचेच विश्लेषन या ग्रंथात आहे. जातक कथा सांगतात की, बुद्धत्व प्राप्तीसाठी बोधिसत्वाला ५४७ जन्म घ्यावे लागले. चरियापिटक ग्रंथात मात्र सात पारमिता पूर्ण करण्याकरिता ३५ जन्म घ्यावे लागले. पारमिता पूर्ण केल्यानेच ते बुद्ध झाले. अशा प्रकारे मानवाच्या पुढे हा सर्वोत्तम आदर्श ठेवण्यात आला आहे.

पारमिता दहा असल्यातरी प्रस्तुत ग्रंथात फक्त सात पारमितांचे वर्णन आहे. या सात पारमिता या ग्रंथातील ३५ चर्यांशी संबंधित आहेत. यात जेवढ्या चर्या आहेत त्या सर्व जातक कथांमध्ये आलेल्या आहेत. उदाहरणार्थ अकित्ति चरिय-अकित्तिजातक, संखचरियं—संखजातक, कुरुधम्मचरियं—कुरुधम्मजातक. जातक कथाशी या चर्या संबधित असूनसुद्धा त्यांची शैली जातकाच्या शैलीहून भिन्न आहे. प्रत्येक पारमितेच्या सुरवातीला आलेल्या चर्यांचा प्रारंभ 'यदा अहोसि' या शब्दांनी होतो. परंतु नंतर आलेल्या चर्यांची सुरवात 'पुनापरं यदा होमि' या शब्दांनी झालेला आहे.

या चर्यामधील अनेक कथा दीघनिकाय, सुत्तनिपात, अङ्गत्तर निकाय आदी ग्रंथात आलेल्या आहेत. जातक माला नामक संस्कृत ग्रंथात सुद्धा ३५ चर्यांचे वर्णन आहे. 'महावत्थु' या ग्रंथात सुंसुमारजातक, महागोविन्दचर्या आणि वानर जातक या कथा आलेल्या आहेत. भद्रकल्प अवदान ग्रंथात सीलवनाग आणि सुतसोम या कथा आलेल्या आहेत. बोधिसत्व अवदान या ग्रंथामध्ये सीवि, सस, मच्छ, वट्टपोतक आणि सुतसोम आदी कथांचे वर्णन आहे. अशाप्रकारे आपल्या लक्षात येते की, चरियापिटक ग्रंथात आलेल्या कथा फक्त जातक कथांमध्येच आलेल्या नाहीत तर संपूर्ण पालि आणि संस्कृत बौद्ध साहित्यात व्यापक रुपाने आलेल्या आहेत. अशा या महत्वपूर्ण ग्रंथाची भाषा साधी व सोपी असून शैलीच्या बाबतीत या ग्रंथाची तुलना धम्मपद ग्रंथाशी केली जाऊ शकते.

चरियापिटक ग्रंथाचे एक आगळे महत्व आहे. या ग्रंथाच्या अध्ययनाने पारमिता पूर्ण करण्याची प्रेरणा मिळते. संसारापासून मुक्त होण्याची भावना जागृत होते. बोधिसत्वाच्या या चर्येपासून माणसाचे साहस वाढते. कठीण कार्य करण्याचे, आपत्तींना तोंड देण्याचे, सुख-दुःखात न डगमगता समभाव ठेवण्याचे धैर्य प्राप्त होते. या ग्रंथातील पारमिता मानवी जीवन उन्नत करण्याच्या पायऱ्या आहेत. त्यातील दान, शील, सत्य, मैत्री, क्षमा, शांती आदी गुण मानवाला उत्थानाच्या शिखरावर पोचविणारे आहेत.

अशाप्रकारे चरियापिटक ग्रंथ पालि साहित्यातील एक महत्वाचा ग्रंथ असल्यामुळे प्रस्तुत अनुवाद वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

ज्यांच्या आचरणाने मानवी जीवनास पूर्णत्व प्राप्त होते, मानवी उत्थानासाठी आज ज्या शीलगुणांची आत्यंतिक गरज आहे, ज्यांच्यामुळे समाजात बंधुभावाची, समतेची आणि एकात्मतेची भावना वृद्धिंगत होते, माणसा-माणसातील अंतर कमी होऊन यांच्यात मैत्री वाढविता येते अशा दान, शील, नैष्कर्म्य, अधिष्ठान,

अनुक्रमणिका

सत्य, मैत्री, उपेक्षा, प्रज्ञा, वीर्य आणि शांती या दहा पारमितांचे वर्णन ज्यात आहे असा अत्यंत महत्वपूर्ण 'चरियापिटक' ग्रंथ महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने मूळपालि आणि भाषांतर प्रकाशनासाठी निवडला त्याबद्दल मी मंडळाचे तत्कालीन अध्यक्ष तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

पालि भाषा आणि साहित्याचे सुप्रसिद्ध विद्वान आणि गाढे अभ्यासक डॉ. पु. वि. बापट यांनी ग्रंथाचे हस्तलिखित परिश्रमपूर्वक तपासून बहुमोल आणि उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनाची जाण असलेले डॉ. य. दि. फडके साहित्य संस्कृती मंडळाच्या अध्यक्षपदावर आले त्यांनी मात्र या ग्रंथावर अनेक वर्षे साचलेली धूळ झटकून ग्रंथ प्रकाशनासाठी घेतला त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. मंडळाचे एक सदस्य डॉ. एस्. एस. भोसले यांनी या कामी बरेच परिश्रम घेतले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. मंडळाचे सचिव, श्री. चद्रकांत वडे यांनी आपल्या प्रशासकीय कामाच्या व्यापातून वेळ काढून 'चरियापिटक' ग्रंथाच्या भाषांतराचे प्रकाशन लवकर व्हावे यासाठी तत्परतेने लक्ष घातले त्यामुळे ग्रंथाचे प्रकाशन होऊ शकले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे चे व्यवस्थापक मा. श्री. वि. शं. देशमुख आणि त्यांचा कर्मचारी वर्ग यांनी ग्रंथाच्या छपाईचे कार्य उत्तम प्रकारे केले त्याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

औरंगाबादेतील उदयोन्मुख चित्रकार श्री. शीतल शहाणे यांच्या कुंचल्यातून ग्रंथाचे अत्यंत सुंदर असे मुखपृष्ठ साकार झाले त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

औरंगाबाद,

आश्विन पौर्णिमा

**प्रा. डॉ. शेषराव कचरुजी मेश्राम**

३० ऑक्टोबर १९९३.

अनुक्रमणिका

# चरियापिटक

अनुक्रमणिका

पठमो परिच्छेदो (पहिला परिच्छेद)

दानपारमिता (दानपारमिता)

## १. अकित्ति–चरियं (१ अकीत्ति चर्या)

कप्पे च सत-सहस्से चतुरो च असङ्खेय्ये
एत्थीन्तरे यं चरितं सब्बं तं बोधिपाचनं ॥ १ ॥

चार असंख्य आणि एक लाख कल्प यामध्ये माझ्या ज्या चर्या होत्या, त्यासर्व बुद्धत्वाकडे नेणाऱ्या होत्या. ॥ १ ॥

अतीतकप्पे चरितं ठपयित्वा भवाभवे
इमम्हि कप्पे चरितं पवक्खिस्सं सुणोहि मे ॥ २ ॥

भूतकाळातील कल्पामध्ये जन्मजन्मांतराच्या चर्या सोडून मी (फक्त) या कल्पातील चर्या सांगेन, (हे) माझे (कथन) ऐका. ॥ २ ॥

यदा अहं ब्रहारञ्ञे सुञ्ञे विपिनकानने
अज्झोगाहेत्वा विहरामि अकित्तिनाम तापसो ॥ ३ ॥

जेव्हा मी शून्य महान अरण्यामध्ये प्रवेश करून अकीर्ती नावाचा तपस्वी म्हणून विहार करीत होतो. ॥ ३ ॥

तदा मं तपतेजेन सन्तत्तो तिदिवाभिभू
धारेन्तो ब्राह्मणवण्णं भिक्खाय मं उपागमि ॥ ४ ॥

तेव्हा माझ्या तपाच्या तेजाने संतप्त झालेला इन्द्र ब्राम्हण रुप धारण करून भिक्षे करिता माझ्याकडे आला. ॥ ४ ॥

प-वना आभतं पण्णं अतेलञ्च अलोणिकं
मम द्वारे ठितं दिस्वा सकटाहेन आकिरिं ॥ ५ ॥

मी (त्याला) आपल्या दारात उभा असलेला पाहून, वनातून आणलेली तेल-मीठ रहित पाने स्वतःच्या कटोऱ्यातून दिली. ॥ ५ ॥

तस्स दत्वान ‘हं पण्णं निक्कुज्जित्वान भाजनं
पुनेसनं जहित्वान पाविसिं पण्णसालकं ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

मी त्याला पाने देऊन भांडे (कटोरा) उपडे ठेऊन, पुनः पानांचा शोध घेणे सोडून पर्णकुटीत प्रवेश केला. ॥ ६ ॥

दुतियम्पि ततियम्पि उपागच्छि ममन्तिकं
अकम्पितो अनोलग्गो एवमेवमदा'सहं ॥ ७ ॥

तो दुसऱ्यांदासुद्धा तिसऱ्यांदासुद्धा माझ्या जवळ आला, मी असेच अविचलित व अनासक्त (होऊन) दान दिले. ॥ ७॥

न मे तप्पच्चया अत्थि सरीरस्मिं विवण्णियं
पीतिसुखेन रतिया वीतिनामेमि तं दिवं ॥ ८ ॥

त्या कारणाने माझ्या शरीराच्या कान्तीत कमीपणा आला नाही. मी तो दिवस प्रीतीसुखाने व आनंदानेघालविला. ॥ ८ ॥

यदि मासम्पि व्दे मासं दक्खिणेय्यं वरं लभे
अकम्पितो अनोलीनो ददेय्यं दानमुत्तमं ॥ ९ ॥

जर एक महिना, दोन महिने पर्यंतसुद्धा श्रेष्ठ दान देण्यायोग्य व्यक्ती लाभली तरी अविचलित उदास न होता उत्तम दान देईन. ॥ ९॥

न तस्स दानं ददमानो यसं लाभञ्च पत्थयिं
सब्बञ्ञुतं पत्थयानो तानि कम्मानि आचरिं ति ॥ १० ॥

त्याला दान देतांना मी यशाची व लाभाची इच्छा धरली नाही (फक्त) सर्वज्ञता प्राप्तीची अभिलाषा करीत ती मी कर्मे केली. ॥ १०॥

□□

अनुक्रमणिका

## २. सङ्ख चरियं (**२. शंख-चर्या**)

पुनापरं यदा होमि ब्राह्मणो सङ्खसव्हयो
महासमुद्दं तरितुकामो उपगच्छामि पट्टनं ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी शंख नावाचा ब्राह्मण झालो तेव्हा महासमुद्र ओलांडण्याच्या इच्छेने बंदराकडे जात होतो. ॥ १ ॥

तत्थ' द्दसामि पटिपथे सयम्भुमपराजितं
कन्तारमद्धानं पटिपन्नं तत्ताय कठिनभूमिया ॥ २ ॥

तेथे मी रेताळ, तापलेल्या आणि खाच-खळगे असलेल्या जमिनीवरून उलट मार्गाने येणाऱ्या प्रत्येक बुद्धाला मी पाहिले. ॥ २ ॥

तमहं पटिपथे दिस्वा इममत्थं विचिन्तयिं
इदं खेत्तं अनुपत्तं पुञ्ञकामस्स जन्तुनो ॥ ३ ॥

मी त्याला उलट मार्गावर पाहून हा विचार केला पुण्याची इच्छा करणाऱ्या व्यक्तीकरिता हे क्षेत्र प्राप्त झाले आहे. ॥ ३ ॥

यथापि कस्सको पुरिसो खेत्तं दिस्वा महागमं
तत्थ बीजं न रोपेति न सो धञ्ञेन अत्थिको ॥ ४ ॥

ज्याप्रमाणे शेतकरी माणूस चांगली सुपीक शेत जमीन पाहून सुद्धा जर तेथे बी पेरत नसेल तर त्याला धान्याची इच्छा नाही असे ठरते. ॥ ४ ॥

एवमेवाहं पुञ्ञकामो दिस्वा खेत्तवरुत्तमं
यदि तत्थ कारं न करोमि नाहं पुञ्ञेन अत्थिको ॥ ५ ॥

त्याप्रमाणे पुण्याची इच्छा असलेला मी उत्तम क्षेत्र (पुण्य करण्याचे स्थान) पाहून जर तेथे (काही) सत्कार्य केले नाही तर मी पुण्याची इच्छा करणारा नाही असे होईल. ॥ ५ ॥

यथा अमच्चो मद्दिकामो रञ्ञो अन्तेपुरे जने
न देति तेसं धनधञ्ञं मुद्दितो परिहायति ॥ ६ ॥

ज्याप्रमाणे राजाजवळ उच्चस्थान मिळवू पाहणारा मंत्री जर अंतःपुरातील लोकांना धन-धान्य देत नसेल तर तो उच्चस्थानापासून वंचित होतो. ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

एवमेवाहं पुञ्ञकामो विपुलं दिस्वान दक्खिणं
यदि तस्स दानं न ददामि परिहायिस्सामि पुञ्ञतो ॥ ७ ॥

त्याप्रमाणे पुण्याची इच्छा असलेला मी पुष्कळ दक्षिणा देण्यास योग्य अशी व्यक्ती पाहून जर त्या व्यक्तीला दान देणार नाही तर मी पुण्यापासून वंचित होईन. ॥ ७ ॥

एवाहं चिन्तयित्वान ओरोहित्वा उपाहना
तस्स पादानि वन्दित्वा अदासिं छत्तुपाहनं ॥ ८ ॥

मी याप्रमाणे विचार करून (पायातील) जोडे काढून त्याच्या पायांना वंदन करून छत्री व जोडे दिले. ॥ ८ ॥

तेनेवाहं सतगुणतो सुखुमालो सुखे ठितो
अपि च दानं परिपूरेन्तो एवं तस्स अदासहंति ॥ ९ ॥

मी त्याच्यापेक्षा शतपट सुकुमार व सुखात राहणारा असूनसुद्धा दान (पारमिता) पूर्ण करीत त्याला मी असे दान दिले. ॥ ९ ॥

□□

# ३. कुरुधम्म-चरियं (३. कुरूधम्म-चर्या)

पुनापरं यदा होमि इन्दपत्ते पुरुत्तमे
राजा धनञ्जयो नाम कुसले दसहुपागतो ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी इन्द्रप्रस्थ या उत्तम नगरात दहा कुशल कर्मांनी युक्त असा धनंजय नावाचा राजा होतो. ॥ १ ॥

कालिङ्गरट्ठविसया ब्राह्मणा उपगञ्छु मं
आयाचुं मं हत्थिनागं धञ्ञं मङ्गलसम्मतं ॥ २ ॥

तेव्हा कलिंग राष्ट्रातील (काही) ब्राह्मण माझ्याकडे आले आणि मौल्यवान, मंगल समजला जाणारा हत्ती मला लागू लागले. ॥ २ ॥

अवुट्ठिको जनपदो दुब्भिक्खो छातको महा
ददाहि पवरं नागं नीलं अञ्जनसव्हयं ॥ ३ ॥

'आमचा देश अवर्षण झालेला, दुर्भिक्ष व महादुष्काळ झालेला आहे (त्यामुळे आम्हाला) अंजन नावाचा निळा व उत्तम हत्ती द्या.' ॥ ३ ॥

न मे याचकमनुपत्ते पटिक्खेपो अनुच्छवो
मा मे भिज्जि समादानं दस्सामि विपुलं गजं ॥ ४ ॥

याचक आल्यावर (त्याला) नकार देणे मला योग्य नाही माझे व्रत मोडू नये (त्याकरिता) मी महान हत्ती देईन. ॥ ४ ॥

नागं गहेत्वा सोण्डाय भिङ्कारे रतनामये
जलं हत्थे आकिरित्वा ब्राह्मणानं अदं गजं ॥ ५ ॥

हत्तीच्या सोंडेला धरून व रत्नजडित झारीने (त्यांच्या) हातावर पाणी ओतून मी ब्राह्मणांना हत्ती दिला. ॥ ५ ॥

तस्मिं नागे पदिन्नम्हि अमच्चा एतदब्रवुं
'किन्नु तुय्हं वरं नागं याचकानं पदस्ससि ॥ ६ ॥

तो हत्ती दिल्यावर मंत्री असे म्हणाले 'आपला श्रेष्ठ हत्ती याचकांना कां देत आहात?' ॥ ६ ॥

धञ्ञं मङ्गलसम्पन्नं सङ्गामविजयुत्तमं
'तस्मिं नागे पदिन्नम्हि किन्ते रज्जं करिस्सती ति ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

मौल्यवान, मंगल, युद्धात उत्तम विजय प्राप्त करणारा हत्ती दिल्यावर हे तुझे राज्य तुला कितपत उपयोगी पडणार आहे? ॥ ७ ॥

‘रज्ञम्पि मे ददे सब्बं सरीरं दज्ञमत्तनो
सब्बञ्ञुतं पियं मय्हं तस्मा नागमदासहं’ति ॥ ८ ॥

‘मी संपूर्ण राज्यसुद्धा देईन (त्याचप्रमाणे) स्वतःचे शरीरसुद्धा देईन. मला सर्वज्ञता प्रिय आहे त्यामुळे मी हत्ती दिला.’ ॥ ८ ॥

□□

अनुक्रमणिका

# ४. महासुदस्सनचरियं (४. महासुदस्सन चर्या)

कुसावतिम्हि नगरे यदा आसिं महीपति
महासुदस्सनो नाम चक्कवत्ती महब्बलो ॥ १ ॥

जेव्हा मी कुशावती नगरीत महाशक्तिशाली महासुदर्शन नावाचा चक्रवर्ती राजा होतो. ॥ १ ॥

तत्थाहं दिवसे तिक्खत्तुं घोसापेमि तहिं तहिं
को किं इच्छति पत्थेति कस्स किं दीयतु धनं ॥ २ ॥

तेव्हा मी दिवसातून तीनदा त्या त्या ठिकाणी घोषणा करवीत होतो की, कोणाला काय इच्छा आहे, कोणाला काय पाहिजे, कोणाला किती धन दिले जावे? ॥ २ ॥

को छातको को तसितो को मालं को विलेपनं
नानारत्तानि वत्थानि को नग्गो परिदहिस्सति ॥ ३ ॥

कोंण भुकेलेला आहे, कोण तहानलेला आहे, कोणाला माळा अथवा विलेपन पाहिजे, कोण नग्न (माणूस) वेगवेगळ्या रंगाची वस्त्रे नेसेल? ॥ ३ ॥

को पथे छत्तमादेति कोपाहना मुदू सुभा
इति सायंच पातो च घोसापेमि तहिं तहिं ॥ ४ ॥

कोण रस्त्यात छत्री घेईल? कोण मऊ व सुंदर जोडे ग्रहण करील? अशाप्रकारे त्या त्या ठिकाणी सकाळी व संध्याकाळी घोषणा करवीत असे. ॥ ४ ॥

न तं दससु ठानेसु नपि ठानसतेसु वा
अनेकसतठानेसु पटियत्तं याचके धनं ॥ ५ ॥

याचकांना धन देण्याकरिता दहा अथवा शंभर ठिकाणीच नाही तर कित्येक शेकडो ठिकाणी व्यवस्था केली होती. ॥ ५ ॥

दिवा वा यदि वा रत्तिं यदि एति वनिब्बको
लद्धा यदिच्छिकं भोगं पूरहत्थो व गच्छति ॥ ६ ॥

दिवसा अथवा रात्री याचक आला की तो आपल्या इच्छेप्रमाणे उपभोग्य वस्तू प्राप्त करून परिपूर्ण हाताने जात असे. ॥ ६ ॥

एवरूपं महादानं अदासिं यावजीविकं
न पाहं देस्सं धनं दम्मि नपि नत्थि निचयो मयि ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

अशाप्रकारे मी जीवनभर महादान दिले, मी धनाचा द्वेष करीत होतो म्हणून धन दिले असे नाही अथवा 'माझ्याकडे (धनाचा) संग्रह नाही' (अशा प्रकारची श्रमणीची स्थिती प्राप्त व्हावी असे नाही). ॥ ७ ॥

यथापि आतुरो नाम रोगतो परिमुत्तिया
धनेन वेज्जं तप्पेत्वा रोगतो परिमुच्चति ॥ ८ ॥

ज्याप्रमाणे रोगी (माणूस) रोगापासून मुक्त होण्याकरिता वैद्याला धनाने तृप्त करून रोगापासून मुक्त होतो. ॥ ८ ॥

तयेवाहं जानमानो परिपूरेतुमसेसतो
ऊनमनं पूरयितुं देमि दानं वनिब्बके
निरालयो अपच्चासो सम्बोधिमनुपत्तिया'ति ॥ ९ ॥

त्याप्रमाणे मी जाणीवपूर्वक अपरिपूर्ण इच्छा असलेल्या याचकांची इच्छा सर्व दृष्टीने पूर्ण करण्याकरिता व संबोधि प्राप्ती करिता, अनासक्त व निरिच्छ होऊन, याचकांना दान देत असे. ॥ ९ ॥

□□

अनुक्रमणिका

## ५. महागोविंदचरियं (५. महागोविंद चर्या)

पुनापरं यदा होमि सत्तराजपुरोहितो
पूजितो नरदेवेहि महागोविन्दो ब्राह्मणो ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी राजांकडून पूजिला जाणारा सात राजांचा पुरोहित महागोविंद नावाचा ब्राह्मण होतो, ॥ १ ॥

तदाहं सत्तरज्जेसु यं मे आसि उपायनं
तेन देमि महादानं अक्खोब्भं सागरूपमं ॥ २ ॥

तेव्हा सात राज्यातील जी माझी प्राप्ती (मिळकत) होती त्यातून मी शांत सागराप्रमाणे महादान देत असे. ॥ २ ॥

न मे देस्सं धनधञ्ञं नपि नत्थि निचयो मयि
सब्बञ्ञुत पियं मय्हं तस्मा देमि वरं धनं ति ॥ ३ ॥

मी न देण्यायोग्य धन-धान्य दिले नाही अथवा माझ्याकडे (धन-धान्याचा) संग्रह नव्हता (असे नाही) परंतु मला सर्वज्ञता प्रिय होती त्याकरिताच मी श्रेष्ठ धन दिले. ॥ ३ ॥

□□

अनुक्रमणिका

# ६. निमिराजचरियं (६. निमिराज चर्या)

पुनापरं यदा होमि मिथिलायं पुरुत्तमे
निमि नाम महाराजा पण्डितो कुसलत्थिको ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी उत्तम मिथिला नगरीत पुण्याची इच्छा करणारा व पंडीत निमि नावाचा महाराज होतो, ॥ १ ॥

तदाहं मापयित्वान चतुस्सालं चतुम्मुखं
तत्थ दानं पवत्तेसिं मिग-पक्खि-नरादिनं ॥ २ ॥

तेव्हा मी चार द्वारे असलेल्या दानशाळा बांधून तेथे पशू, पक्षी, मनुष्य आदींना दान देत होतो. ॥ २ ॥

अच्छादनंच सयनंच अन्नपानंच भोजनं
अब्बोच्छिन्नं करित्वान महादानं पवत्तयिं ॥ ३ ॥

आच्छादन, (नेसण्याचे व पांघरण्याचे वस्त्र) शयन, अन्नपाणी, भोजन इत्यादींचे खंड न पडता (निरंतर) महादान देत असे. ॥ ३ ॥

यथापि सेवको सामिं धनहेतुमुपागतो
कायेन वाचा मनसा आराधनीयमेसति ॥ ४ ॥

ज्याप्रमाणे धनाच्या हेतूने मालकाकडे आलेला सेवक काया, वाचा, मनाने मालकाला प्रसन्न करण्याचे उपाय शोधतो, ॥ ४ ॥

तथेवाहं सब्बभवे परियेसिस्सामि बोधिजं
दानेन सत्ते तप्पेत्वा इच्छामि बोधिमुत्तमंति ॥ ५ ॥

त्याप्रमाणे मी सर्व जन्मामध्ये बोधिपासून उत्पन्न होणारी (सर्वज्ञता) शोधेन, दानाने प्राण्यांना तृप्त करून मी उत्तम बोधिची (परमज्ञान) इच्छा करतो. ॥ ५ ॥

□□

# ७. चन्दकुमारचरियं (७. चंद्रकुमार चर्या)

पुनापरं यदा होमि एकराजस्स अत्रजो
नगरे पुप्फवतिया कुमारो चन्दसव्हयो ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी पुष्पवती नगरीत चंद्रकुमार नावाचा एक राजाचा पुत्र होतो, ॥ १ ॥

तदाहं यजना मुत्तो निक्खन्तो यञ्ञवाटतो
संवेगं जनयित्वान महादानं पवत्तयिं ॥ २ ॥

तेव्हा मी यज्ञापासून मुक्त होऊन यज्ञ शाळेतून बाहेर आल्यावर संवेग उत्पन्न होऊन महादान दिले. ॥ २ ॥

नाहं पिवामि खादामि नपि भुञ्जामि भोजनं
दक्खिणेय्यं अदत्वान अपि छप्पञ्च रत्तियो ॥ ३ ॥

मी याचकांना (दक्षिणा देण्यायोग्य लोकांना) दान दिल्याशिवाय पाच सहा रात्रीपर्यंत (काहीच) पीत नसे, खात नसे आणि जेवणसुद्धा घेत नसे, ॥ ३ ॥

यथापि वाणिजो नाम कत्वान भण्डसञ्चयं
यत्थ लाभो महा होति तत्थाहरति भण्डकं ॥ ४ ॥

ज्याप्रमाणे व्यापारी (व्यापाराचा) माल एकत्र करून जेथे पुष्कळ लाभ (नफा) होतो तेथे माल नेतो. ॥ ४ ॥

तथेव सकभुत्तापि परे दिन्नं महप्फलं
तस्मा परस्स दातब्बं सतभागो भविस्सति ॥ ५ ॥

त्याप्रमाणे स्वतः जेवण्यापेक्षा दुसऱ्याला दिलेले महत्फलदायक होते. त्यामुळे दुसऱ्याला (दान) दिले पाहिजे ते शतपट होते. ॥ ५ ॥

एतमत्थवसं ञत्वा देमि दानं भवाभवे
न पटिक्कमामि दानतो सम्बोधिमनुपत्तिया'ति ॥ ६ ॥

ही वस्तुस्थिती जाणून मी जन्मजन्मान्तरामध्ये दान देत असे, सम्बोधि-प्राप्तीकरिता मी दानापासून पाठ फिरवित नसे. ॥ ६ ॥

□□

अनुक्रमणिका

## ८. सिविराजचरियं (८. शिविराज चर्या)

अरिट्ठसव्हये नगरे सिवि नामासि खत्तियो
निसज्ज पासादवरे एवं चिन्तेसहं तदा ॥ १ ॥

जेव्हा मी अरिष्ट नावाच्या नगरीमध्ये शिवि नावाचा क्षत्रिय राजा होतो तेव्हा मी उत्तम राजप्रासादावर बसून अशाप्रकारे विचार केला. ॥ १ ॥

यं किञ्चि मानुसं दानं अदिन्नं मे न विज्जति
योपि याचेय्य मं चक्खुं ददेय्यं अविकम्पितो ॥ २ ॥

जे काही मानवी दान आहे ते माझ्याकडून दिले गेले नाही असे नाही. जो कोणी मला डोळा मागेल, त्याला मी अविचलित होऊन देईन. ॥ २ ॥

ममसङ्कप्पमञ्ञाय सक्को देवानमिस्सरो
निसिन्नो देवपरिसाय इदं वचनमंब्रवि ॥ ३ ॥

(हा) माझा संकल्प जाणून देवांचा राजा इंद्र देवपरिषदेत बसला असता असे बोलला. ॥ ३ ॥

निसज्ज पासादवरे सिविराजा महिद्धिको
चिन्तेन्तो विविधं दानं अदेय्यं सो न पस्सति ॥ ४ ॥

महाशक्तिशाली शिविराजा उत्तम राजप्रासादावर बसला असता व विविध दानांचा विचार करीत असता आपणास देता येणार नाही असे दान त्याला दिसतच नाही. ॥ ४ ॥

तथं नु वितथं नेतं हन्द वीमंसयामि तं
मुहुत्तं आगमेय्याथ याव जानामि तं मनं'ति ॥ ५ ॥

हे सत्य आहे की, असत्य आहे ह्याची मी परीक्षा घेतो. मला त्या मनाचा ठाव घेता येईपर्यंत थोडा वेळ थांबा. ॥ ५ ॥

पवेधमानो पलितसिरो वलितगत्तो जरातुरो
अन्धवण्णो'ब हुत्वान राजानं उपसङ्कमि ॥ ६ ॥

थरथर कापणारा, पांढऱ्या केसांचा शरीरावर सुरकुत्या पडलेला, म्हातारपणाने ग्रस्त अशा आंधळ्याचे रुप धारण करून राजाकडे आला. ॥ ६ ॥

सो तदा पग्गहेत्वान वामं दक्खिणबाहु च
सिरस्मिं अञ्जलिं कत्वा इदं वचनमब्रवि ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

तेव्हा तो परिश्रमपूर्वक डावा आणि उजवा हात जोडून व डोक्यावर अंजली धारण करून असे म्हणाला, ॥ ७ ॥

याचामि तं महाराज धम्मिक रट्ठवड्ढन!
तव दानरता कित्ति उग्गता देवमानुसे ॥ ८ ॥

“हे धार्मिक! राष्ट्रवर्धन महाराज! मी आपणास याचना करतो. आपली दानाच्या आवडीसंबंधाची कीर्ती देव व मनुष्य यामध्ये पसरली आहे. ॥ ८ ॥

उभोपि नेत्ता नयना अन्धा उपहता मम
एकं मे नयनं देहि त्वम्पि एकेन यापया’ति ॥ ९ ॥

माझे दोन्ही डोळे आंधळे आणि निकामी झाले आहेत मला एक डोळा दे आणि तू सुद्धा एकाने काम भागव.” ॥ ९ ॥

तस्साहं वचनं सुत्वा हट्ठो संविग्गमानसो
कतञ्जली वेदजातो इदं वचनमब्रवि ॥ १० ॥

मी त्याचे वचन ऐकून हर्षित व पुलकित मनाने हात जोडून आनन्दाने हे वचन म्हटले— ॥ १० ॥

“इदानाहं चिन्तयित्वान पासादतो इधागतो
त्वं मम चित्तमञ्ञाय नेत्तं याचितुमागतो ॥ ११ ॥

“आताच मी विचार करून राजप्रासादावरुन येथे आलो आहे. तू माझे चित्त (मन) जाणून माझे डोळे मागण्याकरिता आला आहेस. ॥ ११ ॥

अहो मे मानसं सिद्धं सङ्कप्पो परिपूरितो
अदिन्नपुब्बं दानवरं अज्ज दस्सामि याचके” ॥ १२ ॥

अहो माझ्या मनातील विचार सिद्ध झाला आहे! संकल्प परिपूर्ण झाला आहे! पूर्वी (कधीही) न दिलेले श्रेष्ठ दान मी आज याचकाला देईन. ॥ १२ ॥

एहि [टीकेत हाही पाठ दिला आहे.] सिवक उट्ठेहि मा दन्धहि मा पवेधयि
उभोपि नयने देहि उप्पाटेत्वा वनिब्बके ॥ १३ ॥

हे (वैद्यराज) [शिवक हा राजाचा वैद्य होता—अट्ठकथा] शिवका ये! उठ, उशीर करू नकोस, विचलित होऊ नकोस, माझे दोन्ही डोळे उपटून काढून याचकाला दे. ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

ततो सो चोदितो मय्हं सिवको वचनं करो
उद्धरित्वान पादासि तालमिञ्जं’व याचके ॥ १४ ॥

तेव्हा माझ्या आज्ञेचे पालन करणाऱ्या शिवकाने मी आग्रह केल्यामुळे ताडाच्या फळाप्रमाणे (माझे डोळे) काढून याचकाला दिले. ॥ १४ ॥

ददमानस्स देन्तस्स दिन्नदानस्स मे सतो
चित्तस्स अञ्ञथा नत्थि बोधिया येव कारणा ॥ १५ ॥

मी दान देण्याच्या तयारीत असताना, देत असताना अथवा दिल्यावर बोधिच्याच कारणाने माझे चित्त विचलित झाले नाही. ॥ १५ ॥

न मे देस्सा उभो चक्खू अत्ता पि [टीकेत हाही पाठ दिला आहे.] मे न देस्सियो
सब्बञ्ञुतं पियं मय्हं तस्मा चक्खुं अदासहंति ॥ १६ ॥

मला दोन्ही डोळ्यांबद्‌दल द्वेष नव्हता अथवा मी स्वतःदेखील स्वतःचा द्वेष करीत नव्हतो. मला सर्वज्ञता प्रिय होती त्यामुळेच मी डोळे दान दिले.” ॥ १६ ॥

□□

अनुक्रमणिका

# ९. वेस्सन्तरचरियं (९. वैइयन्तर चर्या)

या मे अहोसि जनिका फुसती नाम खत्तिया
सा अतीतासु जातीसु सक्कस्स च महेसिया ॥ १ ॥

जी माझी फुसती नावाची क्षत्रिय आई होती, ती पूर्व जन्मामध्ये इंद्राची पट्टराणी होती. ॥ १ ॥

तस्सा आयुक्खयं दिस्वा देविन्दो एतदब्रवि
ददामि ते दस वरे वर भद्दे! यदिच्छसी'ति ॥ २ ॥

तिच्या आयुष्याचा शेवट पाहून देवेंद्र (इंद्र) असे म्हणाला– 'भद्रे! मी तुला इच्छित असे दहा वर देतो.' ॥ २ ॥

एवं वुत्ता च सा देवी सक्कं पुरिन्दमब्रवि
किन्नु मे अपराधत्थि किन्नु देस्सा अहं तव
रम्मा चावेसि मं ठाना वातो'व धरणी-रुहं ति ॥ ३ ॥

असे म्हटल्यावर त्या देवीने देवेंद्र (इन्द्राला) असे म्हटले 'माझा काय अपराध आहे? काय मी आपल्याला तिरस्करणीय झाले आहे? वारा जमिनीत उगवणारे झाड पाडतो त्याप्रमाणे आपण मला रम्य स्थानावरुन खाली पाडत आहात. ॥ ३ ॥

एवं वुत्ते च सो सक्को पुन तस्सेदमब्रवि–
'न चेव ते कतं पापं न च मे त्वमसि अप्पिया ॥ ४ ॥

असे म्हटल्यावर त्या इंद्राने पुन्हा तिला असे म्हटले– 'तू पाप केले नाहीस, तसेच तू मला अप्रियही नाहीस. ॥ ४ ॥

एत्तकं एव ते आयुं चवनकालो भविस्सति
पटिगण्ह मया दिन्ने वरे दस वरुत्तमे'तिं ॥ ५ ॥

तुझे आयुष्य एवढेच आहे, आता च्युतीची ही वेळ होईल, मी दिलेले हे उत्तम दहा वर ग्रहण कर. ॥ ५ ॥

सक्केन सा दिन्नवरा तुट्ठहट्ठा पमोदिता
ममं अब्भन्तरं कत्वा फुसती दस वरे वरी ॥ ६ ॥

इंद्राने वर दिल्यावर ती अत्यंत आनंदित व प्रमुदित झाली. माझा अन्तर्भाव ज्यात आहे असे दहा वर फुसतीने मागितले. ॥ ६ ॥

ततो चुता सा फुसती खत्तिये उपपज्जथ
जेतुत्तरम्हि नगरे सञ्जयेन समागमि ॥ ७ ॥

तेथून च्युत होऊन (इंद्राच्या घरून खाली पडल्यावर) ती फुसती क्षत्रिय कुळात जन्माला आली. जेतुत्तर नगरीत संजयाशी तिचा विवाह झाला. ॥ ७ ॥

यदाहं फुसतिया कुच्छिं ओक्कन्तो पियमातुया
मम तेजेन मे माता सदा दानरता अहु ॥ ८ ॥

जेव्हा मी माझी प्रिय आई फुसती हिच्या गर्भात आलो तेव्हा माझ्या प्रभावाने माझी आई दान-रत झाली. ॥ ८ ॥

अधने आतुरे जिण्णे याचके [टीकेतील श्रेयस्कर पाठ] अध्दिके जने
समणेब्राम्हणे खीणे देति दानं अकिञ्चने ॥ ९ ॥

ती निर्धन, रोगी, म्हातारे, भिकारी, वाटसरु, श्रमण-ब्राह्मण, क्षीण झालेल्यांना तसेच अपरिग्रही जनांना दान देत असे. ॥ ९ ॥

दसमासे धारयित्वान करोन्ते पुरपदक्खिणं
वेस्सानं वीथिया मज्झे जनेसि फुसती ममं ॥ १० ॥

मला दहा महिने (गर्भात) धारण करून नगराला प्रदक्षिणा घालताना माझ्या फुसती ॥ १० ॥

न मय्हं मेत्तिकं नामं नपि पेत्तिकसम्भवं
जातोम्हि वेस्सवीथिया तस्मा वेस्सन्तरो अहु ॥ ११ ॥

माझे नाव आईने दिलेले नाही अथवा वडिलाने ठेवलेले नाव नाही. मी वैश्यांच्या गल्लीमध्ये जन्मलो म्हणून माझे वेस्संतर हे नाव पडले. ॥ ११ ॥

यदाहं दारको होमि जातिया अट्ठवस्सिको
तदा निसज्ज पासादे दानं दातुं विचिन्तयिं ॥ १२ ॥

जेव्हा मी जन्माने आठ वर्षाचा बालक झालो तेव्हा प्रासादावर बसून दान देण्याचा विचार केला. ॥ १२ ॥

हदयं ददेय्यं चक्खुं मंसम्पि रुहिरम्पि च
ददेय्यं कायं सावेत्वा यदि कोचि याचये ममं ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

जर कोणी माझ्याकडे याचना केली तर मी घोषणा करून (माझे) हृदय, चक्षु, मांस, रक्त आणि शरीरसुद्धा दान देईन. ॥ १३ ॥

सभावं चिन्तयन्तस्स अकम्पितमसण्ठितं
अकम्पि तत्थ पठवी सिनेरुवनवटंसका ॥ १४ ॥

अकम्पित, अविचलित असा (माझ्या) स्वभावाचा विचार करीत असता मेरु (पर्वत) आणि वनांनी अलंकृत अशी पृथ्वी कंपित झाली. ॥ १४ ॥

अन्बद्धमासे पण्णरसे पुण्ण-मासे उपोसथे
पच्चयं नागमारुय्ह दानं दातुं उपागमिं ॥ १५ ॥

मी दर अर्ध्या महिन्याने (म्हणजे) पौर्णिमेला व महिन्याच्या शेवटी येणाऱ्या उपोसथाच्या दिवशी, प्रत्यय नावाच्या हत्तीवर आरूढ होऊन दान देण्याकरिता (दानशाळेत) जात असे. ॥ १५ ॥

कलिङ्गरट्ठविसया ब्राह्मणा उपगञ्छु मं
अयाचुं मं हत्थिनागं धञ्ञं मङ्गलसम्मतं ॥ १६ ॥

(एके दिवशी) कलिंग राष्ट्रातून (काही) ब्राह्मण माझ्याकडे आले त्यांनी मौल्यवान व मंगल समजला जाणाऱ्या हत्तीची याचना केली– ॥ १६ ॥

अवुट्ठिको जनपदो दुब्भिक्खो छातको महा
ददाहि पवरं नागं सब्बसेतं गजुत्तमं ॥ १७ ॥

'आमचा देश अवर्षण झालेला, दुर्भिक्ष व महादुष्काळ पडलेला आहे (त्यामुळे आम्हाला) संपूर्ण पांढरा, उत्तम व श्रेष्ठ असा हत्ती द्या.' ॥ १७ ॥

ददामि न विकम्पामि यं मं याचन्ति ब्राह्मणा
सन्तं नप्पटिगूहामि दाने मे रमति मनो ॥ १८ ॥

ब्राह्मण मला जी याचना करतात ते मी देईन, विचलित होणार नाही, (माझ्याजवळ) असलेले मी लपविणार नाही (कारण) माझे मन दानांत रमणारे आहे. ॥ १८ ॥

न मे याचकमनुप्पत्ते पटिक्खेपो अनुच्छवो
मा मे भिज्जि समादानं दस्सामि विपुलं गजं ॥ १९ ॥

याचक आल्यावर (त्याला) नकार देणे मला योग्य नाही, माझे व्रत मोडू नये (म्हणून) मी महान हत्ती देईन. ॥ १९ ॥

अनुक्रमणिका

नागं गहेत्वा सोण्डाय भिङ्कारे रतनामये
जलं हत्थे आकिरित्वा ब्राह्मणानं अदं गजं ॥ २० ॥

हत्तीच्या सोंडेला धरून व रत्नजडित झारीने (त्यांच्या) हातावर पाणी ओतून मी ब्राह्मणांना हत्ती दिला. ॥ २० ॥

पुनापरं ददन्तस्स सब्बसेतं गजुत्तमं
तदापि पठवी कम्पि सिनेरुवनवटंसका ॥ २१ ॥

पुनः नंतर संपूर्ण पांढरा, उत्तम हत्ती दान देताना सुद्धा मेरु (पर्वत) व वनांनी अलंकृत झालेली पृथ्वी कंपित झाली. ॥ २१ ॥

तस्स नागस्स दानेन सिवयो कुद्धा समागता
पब्बाजेसुं सका रट्ठा वङ्कं गच्छतु पब्बतं ॥ २२ ॥

त्या हत्तीच्या दानाने शिवी-देशवासी क्रोधित झाले माझ्याकडे आले व त्यांनी 'वंक पर्वतावर जा' असे सांगून स्वतःच्या देशातून हाकलून दिले. ॥ २२ ॥

तेसं निच्छुभमानानं अकम्पितमसण्ठितं
महादानं पवत्तेतुं एकं वरमयाचिसं [हा एक पाठ संयुक्तिक आहे.] ॥ २३ ॥

त्यांनी हाकलून दिल्यावर अकम्पित व अविचलित होऊन मी महादान देण्याकरिता एक वर मागितला. ॥ २३ ॥

याचिता सिवयो सब्बे एकं वरमदंसु मे
आसावयित्वा कण्णभेरिं महादानं ददाम' हं ॥ २४ ॥

याचना केल्यावर सर्व शिवी-देशवासियांनी मला एक वर दिला. मी नगाऱ्यांनी घोषणा करविली की, मी महादान देत आहे. ॥ २४ ॥

अथेत्थ वत्तति सद्दो तुमुलो भेरवो महा
दानेन मं नीहरन्ति पुन दानं ददाम हं ॥ २५ ॥

नंतर येथे भयावह, घनघोर असा शब्द (आवाज) होत होता दानामुळेच मला काढून देत होते तरीसुद्धा मी दान देत होतो. ॥ २५ ॥

हत्थी अस्से रथे दत्वा दासिं दासं गवं धनं
महादानं ददित्वान नगरा निक्खमिं तदा ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

हत्ती, घोडे, रथ, दासी, गाई व धन (आदींचे) दान देऊनच मी तेव्हा नगराच्या बाहेर निघालो.
॥ २६ ॥

निक्खमित्वान नगरा निवत्तित्वा विलोकिते
तदापि पठवी कम्पि सिनेरूवनवटंसका ॥ २७ ॥

नगरातून बाहेर निघाल्यावर, मागे फिरून अवलोकन केल्यावर सुद्धा मेरू पर्वत व वनांनी अलंकृत अशी पृथ्वी कंपित झाली. ॥ २७ ॥

चतुवाहिं रथं दत्वा ठत्वा चातुमहापथें
एकाकियो अदुतियो मद्दिदेविं इदमब्रवि ॥ २८ ॥

चौरस्त्यावर उभा राहून चार घोडे जुंपलेला रथ दान दिला. एकटा-दुसरा कोणी नसल्यामुळे माद्री देवीला असे म्हटले— ॥ २८ ॥

'त्वं मद्दि! कण्हं गण्हाहि लहुका एसा कनिट्ठका
अहं जालिं गहेस्सामि गरूको भातिको हि सो ॥ २९ ॥

'हे माद्री! तू कृष्णाला घे, ती लहान व हलकी आहे. तिचा भाऊ वजनदार आहे त्या जालीला मी घेतो.' ॥ २९ ॥

पदुमं पुण्डरीकं' व मद्दी कण्हाजिनमग्गही
अहं सुवण्णबिम्बं'व जालिं खत्तियमग्गहिं ॥ ३० ॥

श्वेत कमळाप्रमाणे असलेल्या कृष्णाजिनेला माद्रीने घेतले आणि मी सुवर्ण बिंबा प्रमाणे असलेल्या जाली क्षत्रिय कुमाराला घेतले. ॥ ३० ॥

अभिजाता सुखुमाला खत्तिया चतुरो जना
विसमंसमं अक्कमन्ता वङ्कं गच्छाम पब्बतं ॥ ३१ ॥

कुलीन, सुकुमार असे आम्ही चारही क्षत्रिय लोक सपाट व खोलगट (जमिनीवरून) चालत वंक पर्वताकडे जाऊ लागलो. ॥ ३१ ॥

ये केचि मनुजा यन्ति अनुमग्गे पटिपथे
मग्गं ते पटिपुच्छाम कुहिं वङ्कंतपब्बतो ॥ ३२ ॥

जी कोणी माणसे आमच्याच दिशेने किंवा समोरून येणारी भेटत होती त्यांना आम्ही मार्ग विचारीत होतो— 'वंक पर्वत कोठे आहे'? ॥ ३२ ॥

अनुक्रमणिका

ते तत्थ अम्हे पस्सित्वा करूणं गिरमुदीरयुं
दुक्खं ते पटिवेदेन्ति दूरे वङ्कतपब्बोतो ॥ ३३ ॥

ते आम्हाला तेथे पाहून करूणापूर्ण शब्द काढीत व व्यथित झाल्याचे दाखवून सांगत होते ‘वंक पर्वत दूर आहे.’ ॥ ३३ ॥

यदि पस्सन्ति पवने दारका फलिते दुमे
तेसं फलानं हेतुम्हि उपरोदन्ति दारका ॥ ३४ ॥

जेव्हा मुले वनामध्ये फळे लागलेली झाडे पाहात असत तेव्हा ती मुले फळाकरिता रडत असत. ॥ ३४ ॥

रोदन्ते दारके दिस्वा उब्बिद्धा विपुला दुमा
सयमेवोणमित्वान उपगच्छन्ति दारके ॥ ३५ ॥

मुलांना रडताना पाहून ऊंच, विशाल वृक्ष स्वतःच वाकून मुलांकडे येत होते. ॥ ३५ ॥

इदमच्छरियं दिस्वा अब्भुतं लोमहंसनं
साधुकारं पवत्तेसि मद्दी सब्बङ्गसोभना ॥ ३६ ॥

हे अद्भूत, रोमहर्षक आश्चर्य पाहून सर्वांगसुंदर माद्रीने आनंद व्यक्त केला. ॥ ३६ ॥

‘अच्छेरं वत लोकस्मिं अब्भुतं लोमहंसनं
वेस्सन्तरस्स तेजेन सयमेवोणता दुमा ॥ ३७ ॥

अहाहा! जगात हे अद्भूत, रोमहर्षक, आश्चर्य आहे. वेस्संतराच्या प्रभावाने वृक्ष स्वतः वाकले आहेत. ॥ ३७ ॥

संखिपिंसु पथं यक्खा अनुकम्पाय दारके
निक्खन्तदिवसेनेव चेतरट्ठमुपागमुं ॥ ३८ ॥

मुलांवर दया करून यक्षांनी मार्ग लहान (छोटा) केला. (त्यामुळे) ते निघालेल्या दिवशीच चेदि राष्ट्रात पोचले. ॥ ३८ ॥

सट्ठिराजसहस्सानि तदा वसन्ति मातुला
सब्बे पञ्जलिका हुत्वा रोदमाना उपागमुं ॥ ३९ ॥

तेव्हा (चेदि राष्ट्रात) साठ हजार राजे रहात होते ते माझे मामे होते. ते सर्व हात जोडून रडत रडत माझ्याकडे आले. ॥ ३९ ॥

तत्थ वत्तेत्वा सल्लापं चेतेहि चेतपुत्तेहि
ते ततो निक्खमित्वान वङ्कं अगमुं पब्बतं ॥ ४० ॥

तेथे चेदिराजे आणि राजकुमार यांच्या बरोबर गप्पा-गोष्टी करून ते तेथून निघून गेल्यावर आम्ही वंक पर्वतावर आलो. ॥ ४० ॥

आमन्तयित्वा देविन्दो विस्सकम्मं महिद्धिकं
अस्समं सुकतं रम्मं पण्णसालं सुमापयि ॥ ४१ ॥

देवेंद्राने महासामर्थ्यशाली विश्वकर्म्याला बोलावून म्हटले— 'सुंदर, रमणीय व पर्णशाळायुक्त आश्रम तयार कर.' ॥ ४१ ॥

सक्कस्स वचनं सुत्वा विस्सुकम्मो महिद्धिको
अस्समं सुकतं रम्मं पण्णसालं सुमापयि ॥ ४२ ॥

इंद्राचे वचन ऐकून महासामर्थ्यशाली विश्वकर्माने सुंदर' रमणीय व पर्णशाळायुक्त आश्रम तयार केला. ॥ ४२ ॥

अज्झोगाहेत्वा पवनं अप्पसद्दं निराकुलं
चतुरो जना मयं तत्थ वसाम पब्बतन्तरे ॥ ४३ ॥

अल्पशब्द व शांत वनात प्रवेश करून आम्ही चारही जण पर्वतावर राहू लागलो. ॥ ४३ ॥

अहं च मद्दि देवी च जालि कण्हाजिना चुभो
अञ्ञमञ्ञं सोकनुदा वसाम अस्समे तदा ॥ ४४ ॥

त्यावेळी मी, माद्री देवी, जाली व कृष्णाजिना हे दोघे, परस्परांचा शोक नष्ट करीत आश्रमात राहू लागलो. ॥ ४४ ॥

दारके अनुरक्खन्तो असुञ्ञो होमि अस्समे
मद्दी फलं आहरति पोसेति सा तयो जने ॥ ४५ ॥

मुलांचे संरक्षण करीत असल्यामुळे मी आश्रमात कधी एकटा नसे. माद्री (वनातून) फळे आणत होती व ती आमचे तिघांचे पालन- पोषण करीत होती. ॥ ४५ ॥

पवने वसमानस्स अद्धिको मं उपागमि
आयाचि पुत्तके मय्हं जालिकण्हाजिने चुभो ॥ ४६ ॥

अनुक्रमणिका

वनात राहात असता (एक) वाटसरु माझ्याकडे आला व त्याने जाली व कृष्णाजिना या माझ्या दोन्ही मुलांची याचना केली. ॥ ४६ ॥

याचकमुपगतं दिस्वा हासो मे उपपज्जथ
उभो पुत्ते गहेत्वान अदासिं ब्राह्मणे तदा ॥ ४७ ॥

याचक आलेला पाहून मला आनंद झाला. दोन्ही मुलांना घेऊन मी त्यांना त्यावेळी ब्राह्मणाला दिले. ॥ ४७ ॥

सके पुत्ते चजन्तस्स याचके ब्राह्मणे यदा
तदापि पठवी कम्पि सिनेरूवनवटंसका ॥ ४८ ॥

जेव्हा मी माझे पुत्र याचक ब्राह्मणाला दिले तेव्हासुद्धा मेरु पर्वत व वनांनी अलंकृत अशी पृथ्वी कंपित झाली. ॥ ४८ ॥

पुनदेव सक्को ओरुय्ह हुत्वा ब्राह्मणसन्निभो
आयाचि मं मद्दिदेविं सीलवतिं पतिव्वतं ॥ ४९ ॥

पुनः इंद्र ब्राह्मणाचे रुप धारण करून खाली (पृथ्वीवर) आला व त्याने माझ्याकडे शीलवान, पतिव्रता माद्री देवीची याचना केली. ॥ ४९ ॥

मद्दिं हत्थे गहेत्वान उदकञ्जलिं पूरय
पसन्नमनसङ्कप्पो तस्स मद्दिं अदासहं ॥ ५० ॥

मी माद्रीचा हात धरून पाण्याने ओंजळ भरून प्रसन्न मनाने त्याला माद्री दिली. ॥ ५० ॥

मद्दिया दीयमानाय गगने देवा पमोदिता
तदापि पठवी कम्पि सिनेरूवनवटंसका ॥ ५१ ॥

माद्री देत असताना आकाशातील देव प्रमुदित झाले. तेव्हा सुद्धा मेरु पर्वत व वनांनी अलंकृत अशी पृथ्वी कंपित झाली. ॥ ५१ ॥

जालिंकण्हाजिनं धीतं मद्दिदेविं पतिव्वतं
चजमानो न चिन्तेसिं बोधिया येव कारणा ॥ ५२ ॥

जाली (पुत्र), कृष्णाजिना कन्या, पतिव्रता माद्री देवी यांचा त्याग करताना मला, बोधिच्याचमुळे कसलीही चिंता वाटली नाही. ॥ ५२ ॥

न मे देस्सा उभो पुत्ता मद्दि देवी न देस्सिया
सब्बञ्‍ञुतं पियं मय्हं तस्मा पिये अदासहं ॥ ५३ ॥

मला माझी दोन्ही मुले तिरस्करणीय नव्हती अथवा माद्रीदेवीसुद्धा तिरस्करणीय नव्हती. मला सर्वज्ञता (सर्वात जास्त) प्रिय होती. त्यामुळे मी प्रिय जनांचे दान केले. ॥ ५३ ॥

पुनापरं ब्रहारञ्‍ञे मातापितु समागमे
करूणं परिदेवन्ते सल्लपन्ते सुखंदुक्खं ॥ ५४ ॥

आणि नंतर मोठ्या अरण्यात आईवडिलांची भेट झाली. ते करुणेने रडत होते आणि सुख दुःख सांगत होते. ॥ ५४ ॥

हिरोत्तप्पेन गरूना उभिन्नं उपसङ्कमि
तदापि पठवी कम्पि सिनेरूवनवटंसका ॥ ५५ ॥

मी लज्ञा व संकोच करीत त्या दोघांकडे गेलो तेव्हासुद्धा मेरु पर्वत व वनांनी अलंकृत अशी पृथ्वी कंपित झाली. ॥ ५५ ॥

पुनापरं ब्रहारञ्‍ञा निक्खमित्वा सञातिभि
पविसामि पुरं रम्मं जेतुत्तर पुरुत्तमं ॥ ५६ ॥

रतनानि सत्त वस्सिंसु महामेघो पवस्सथ
तदापि पठवी कम्पि सिनेरूवनवटंसका ॥ ५७ ॥

आणि नंतर मोठ्या अरण्यातून निघून आपल्या नातलगासह जेतुत्तर या रम्य व उत्तम नगरात प्रवेश केला तेव्हा मोठ्या मेघांनी सात रत्नांची वर्षा केली. तेव्हासुद्धा मेरु पर्वत व वनांनी अलंकृत अशी पृथ्वी कंपित झाली. ॥ ५६-५७ ॥

अचेतनायं पठवी अविञ्‍ञाय सुखं दुक्खं
सापि दानबला मय्हं सत्तक्खतुं पकम्पथाति ॥ ५८ ॥

सुख दुःख न जाणणारी ही अचेतन पृथ्वी सुद्धा माझ्या दान सामर्थ्याने सात वेळा कंपित झाली. ॥ ५८ ॥

□□

अनुक्रमणिका

# १०. ससपण्डितचरियं (१०. शशपंडित चर्या)

पुनापारं यदा होमि ससको पवनचारिको
तिणपण्ण साकफलभक्खो परहेठन विवज्जितो ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी वनात विचरण करणारा, गवत, पाने, भाजीपाला व फळे खाणारा, दुसऱ्याला पीडित करण्यापासून अलिप्त असा ससा होतो. ॥ १ ॥

मक्कटो च सिगालो च उद्दपोतो चहं तदा
वसाम एकसामन्ता सायं पातो पदिस्सरे ॥ २ ॥

तेव्हा माकड, कोल्हा, ऊद आणि मी एकाच ठिकाणी राहात होतो व सकाळी संध्याकाळी एकमेकांजवळ दिसत होतो. ॥ २ ॥

अहं ते अनुसासामि किरिये कल्याणपापके
पापानि परिवज्जेथ कल्याणे अभिनिविस्सथ ॥ ३ ॥

मी त्यांना कल्याणकारक व पापकारक कार्याच्या बाबतीत उपदेश करीत होतो– 'पाप कर्माचा त्याग करा व पुण्य कर्म करा'. ॥ ३ ॥

उपोसथम्हि दिवसे चन्दं दिस्वान पूरितं
एतेसं तत्थ आचिक्खिं दिवसो अज्जुपोसथो ॥ ४ ॥

उपोसथाच्या दिवशी पूर्ण झालेला चंद्र पाहून मी त्यांना असे सांगितले– 'आज उपोसथाचा दिवस आहे.' ॥ ४ ॥

दानानि पटियादेथ दक्खिणेय्यस्स दातवे
दत्वा दानं दक्खिणेय्यं उपवस्सथुपोसथं ॥ ५ ॥

दान देण्यास योग्य अशा (याचकाला) देण्याकरिता दान तयार ठेवा आणि दक्षिणा देण्याला योग्य अशाला दान देऊन उथोसथ (व्रत) करा. ॥ ५ ॥

ते मे साधू ति वत्वान यथासत्ति यथाबलं
दानानि पटियादेत्वा दक्खिणेय्यं गवेसिसुं ॥ ६ ॥

त्यांनी मला 'ठीक आहे' असे सांगून यथाशक्ती यथाबल दाने तयार ठेऊन दक्षिणा देण्यास योग्य अशा व्यक्तिला शोधू लागले. ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

अहं निसज्ज चिन्तेसिं दानं दक्खिण' नुच्छवं
'यदि' हं लभे दक्खिणेय्यं किं मे दानं भविस्सति ॥ ७ ॥

मी बसून देण्यायोग्य दानाचा विचार करू लागलो– 'जर मला दक्षिणा देण्यास योग्य अशी व्यक्ती लाभली तर माझे दान कसल्या तऱ्हेचे असेल? ॥ ७ ॥

न मे अत्थि तिला मुग्गा मासा वा तण्डुला घतं
अहं तिणेन यापेमि न सक्का तिणदातवे ॥ ८ ॥

माझ्याजवळ तीळ, मूग, उडीद, तांदूळ अथवा तूप नाही. मी गवताने उदरनिर्वाह करतो परंतु गवत तर दान देणे शक्य नाही. ॥ ८ ॥

यदि कोचि एति दक्खिणेय्यो भिक्खाय मम सन्तिके
दज्जाहं सकमत्तानं न सो तुच्छो गमिस्सति ॥ ९ ॥

जर कोणी दक्षिणा देण्यास योग्य अशी व्यक्ती माझ्याजवळ भिक्षेकरिता आली तर मी स्वतःला (दान) देईन तो रिकाम्या हाताने जाणार नाही. ॥ ९ ॥

मम सङ्कप्पमञ्ञाय सक्को ब्राह्मणवण्णिना
आसयं मे उपागच्छि दानवीमंसनाय मे ॥ १० ॥

माझा संकल्प जाणून इंद्र ब्राह्मणाच्या रुपाने माझ्या दानाची परीक्षा घेण्याकरिता माझ्या निवासस्थानी आला. ॥ १० ॥

तमहं दिस्वान सन्तुट्ठो इदं वचनमब्रविं
साधु खो'सि अनुप्पत्तो घासहेतु ममन्तिके ॥ ११ ॥

त्याला पाहून मी संतुष्ट झालो व असे म्हटले 'भोजनाकरिता आपण माझ्याजवळ आला हे ठीक झाले. ॥ ११ ॥

अदिन्नपुब्बं दानवरं अज्ज दस्सामि ते अहं
तुवं सीलगुणूपेतो अयुत्तं ते परहेठनं ॥ १२ ॥

मी आज पूर्वी कधीही न दिलेले श्रेष्ठ दान तुम्हाला देईन कारण तुम्ही शील-गुण- युक्त आहात व तुम्हाला दुसऱ्याला पीडा देणे अयोग्य आहे. ॥ १२ ॥

एहि अग्गिं पदीपेहि नानाकट्ठे समानय
अहं पचिस्समत्तानं पक्कं त्वं भक्खयिस्सी'ति ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

या, निरनिराळ्या (ठिकाणाहून) लाकडे गोळा करून अग्नी पेटवा, मी (त्यात) स्वतःला शिजवीन, शिजल्यावर तुम्ही मला खा.' ‖ १३ ‖

साधू'ति सो हट्ठमनो नानाकट्ठे समानयि
महन्तं अकासि चितकं कत्वान' ङ्गारगब्भकं ‖ १४ ‖

ठीक आहे असे म्हणून त्याने आनंदित होऊन निरनिराळ्या (ठिकाणची) लाकडे गोळा केली. आत विस्तव ठेवून त्याने माझ्याकरिता मोठी चिता तयार केली. ‖ १४ ‖

अग्गिं तत्थ पदीपेसि यथा सो खिप्पं महा भवे
फोटेत्वा रजगते गत्ते एकमन्तं उपाविसिं ‖ १५ ‖

तेथे अग्नी अशारीतीने पेटवला की, तो ताबडतोब मोठा होईल. तेव्हा मी धुळीचे अंग झटकून एका बाजूला बसलो. ‖ १५ ‖

यदा महा कट्ठ पुञ्जो आदित्तो धमधमायति
तदुप्पतित्वा पपतिं मज्झे जालसिखन्तरे ‖ १६ ‖

जेव्हा तो मोठा लाकडाचा साठा प्रज्वलित होऊन धमधम करू लागला, तेव्हा मी उडी मारून अग्नीच्या ज्वालांमध्ये पडलो. ‖ १६ ‖

यथा सीतोदकं नाम पविट्ठं यस्सकस्सचि
समेति दरथं परिलाहं अस्सादं देति पीति च ‖ १७ ‖

तथेव जलितं अग्गिं पविट्ठस्स ममं तदा
सब्बं समेति दरथं यथा सीतोदकं विय ‖ १८ ‖

ज्याप्रमाणे शीतल (थंड) पाण्यात प्रवेश केल्यावर कोणाचाही थकवा व दाह शांत होतो, त्याला आस्वाद व प्रीती उत्पन्न होते, त्याप्रमाणे मी त्यावेळी जळत्या अग्नीत प्रवेश केल्यावर शीतल पाण्याने व्हावा तसा माझा संपूर्ण थकवा नाहीसा झाला. ‖ १७-१८ ‖

छविचम्मं मंसं नहारुं अट्ठिं हदयबन्धनं
केवलं सकलं कायं ब्राह्मणस्स अदासहंति ‖ १९ ‖

(त्यावेळी) त्वचा, कातडी, मांस, स्नाविर [ह्या शद्बाकरिता ईशावास्योपनिषद् (८) पहा. शिक्षासमुच्चय (पृ. २०९) व अर्थविनिश्चयसूत्र (पृ. २४, ४१) ह्या ग्रंथात स्नायु व शिरा असे दोन स्वतंत्र शद्ब आहेत. त्याचप्रमाणे महाव्युत्पत्ति कोशात (३९८९-९०) नहरु (पालि-नहारु) व स्नायु हे दोन स्वतंत्र शद्ब आहेत. पालि ग्रंथातून नहारु हा एकच शद्ब स्नायु व स्नाविर ह्याबद्दल ढोबळमानाने वापरलेला दिसतो.] (शिरा), हाडे, हृदयबन्धने संपूर्ण शरीरच मी ब्राह्मणाला दिले. ‖ १९ ‖

अनुक्रमणिका

## उद्दानं (उद्दानं)

अकित्तिब्राह्मणो सङ्खो कुरुराजा धनञ्जयो
महासुदस्सनो राजा महागोविन्द ब्राह्मणो ॥ २० ॥

निमि चन्दकुमारो च सिवि वेस्सन्तरो ससो
अहमेव तदा आसिं यो ते दानवरे अदा ॥ २१ ॥

अकिर्ती ब्राह्मण, शंख, कुरुराजा, धनंजय, महासुदर्शन राजा, महागोविंद ब्राह्मण, निमी, चंद्रकुमार, शिवि, वैश्यन्तर आणि शश (ससा) (अशा रुपात) ज्याने ती श्रेष्ठ दाने दिली तो मीच होतो. ॥ २०-२१ ॥

एते दानपरिक्खारा एतें दानस्स पारमी
जीवितं याचके दत्वा इमं पारमिं पूरयिं ॥ २२ ॥

हे दानाचे परिष्कार (आवश्यकता), ह्या दानाच्या पारमिता (पूर्णत्व प्राप्त करण्याच्या गोष्टी) आहेत. मी आपला जीव याचकाला देऊन ही (दान) पारमिता पूर्ण केली. ॥ २२ ॥

भिक्खाय उपगतं दिस्वा सकत्तानं परिच्चजिं
दानेन मे समो नत्थि एसा मे दानपारमी'ति ॥ २३ ॥

भिक्षेकरिता (कोणी) आलेला पाहून मी स्वतःचासुद्धा त्याग केला. माझ्यासारखा दान देण्यात दुसरा कोणी नाही. ही माझी दानपारसिता होय. ॥ २३ ॥

अनुक्रमणिका

# दुतियो परिच्छेदो/दुसरा परिच्छेद

## सीलपारमिता/शील पारमिता

### १. सीलवनागचरियं (१. शीलवनागचर्या)

यदा अहोसिं पवने कुञ्जरो मातुपोसको
न तदा अत्थि महिया गुणेन मम सादिसो ॥ १ ॥

जेव्हा मी अरण्यात आईचे पालन-पोषण करणारा हत्ती होतो, तेव्हा पृथ्वीवर गुणामध्ये माझ्यासारखा (कोणी) नव्हता. ॥ १ ॥

पवने दिस्वा वनचरो रञ्ञो मं पटिवेदयि
तवानुच्छवो महाराज! गजो वसति कानने ॥ २ ॥

पारध्याने मला अरण्यात पाहून राजाला सांगितले महाराज! आपणास योग्य असा हत्ती अरण्यात राहतो. ॥ २ ॥

न तस्स परिक्खायत्थो नपि आलककासुया
समागहिते सोण्डाय सयमेव इधेहिति ॥ ३ ॥

त्याला (पकडण्यासाठी) खंदकाची, फास-दोऱ्यांनी बांधता येईल अशा खुंटाची किंवा बुजबलेल्या फसव्या खड्ड्याची आवश्यकता नाही. सोंडेला पकडल्यावर तो स्वतःच येथे येईल. ॥ ३ ॥

तस्स तं वचनं सुत्वा राजापि तुट्ठमानसो
पेसेसि हत्थिदमकं छेकाचरियं सुसिक्खितं ॥ ४ ॥

त्याचे ते वचन ऐकून राजाने सुद्धा प्रसन्न मनाने हत्तीचे दमन करणाऱ्या सुशिक्षित व हुशार आचार्याला (माहुताला) पाठविले. ॥ ४ ॥

गन्त्वान सो हत्थिदमको अद्दस पदुमस्सरे
भिसमूलं उद्धरन्तं यापनत्थाय मातुया ॥ ५ ॥

त्या हत्ती दमन करणाऱ्याने जावून आईच्या उदर निर्वाहाकरिता कमळाच्या सरोवरात कमळाचा देठ उपटताना (मला) पाहिले. ॥ ५ ॥

विञ्ञाय मे सीलगुणं लक्खणं उपधारयि
एहि पुत्ताति वत्वान मम सोण्डाय अग्गहि ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

त्याने माझे शीलगुण जाणून (माझी) लक्षणे लक्षात आणूनी हे मुला! ये असे म्हणून माझी सोंड पकडली. ॥ ६ ॥

यं मे तदा पाकतिकं सरीरानुगतं बलं
अज्ज नागसहस्सानं बलेन समसादिसं ॥ ७ ॥

त्यावेळी माझ्या शरीरात जे प्राकृतिक बल होते ते आजच्या हजार हत्तींच्या सामर्थ्या-एवढे होते. ॥ ७ ॥

यदिहं तेसं पकुप्पेय्यं उपेतानं गहणाय मं
पटिबलो भवे तेसं याव रज्जम्पि मानुसं ॥ ८ ॥

मला पकडण्याकरिता आलेल्या त्यांच्यावर जर मी क्रोधित झालो असतो तर त्यांच्या संपूर्ण राज्यातील माणसांना नष्ट केले असते. ॥ ८ ॥

अपि चाहं सीलरक्खाय सीलपारमिपूरिया
न करोमि चित्ते अञ्ञथत्तं पक्खिपन्तं ममालके ॥ ९ ॥

परंतु मी शीलाचे रक्षण करण्याकरिता व शीलपारमिता पूर्ण करण्याकरिता मला पिंजऱ्यात खुंट्याला बांधताना सुद्धा मी चित्तामध्ये विकार येऊ दिला नाही. ॥ ९ ॥

यदि ते मं तत्थ कोट्टेय्युं फरसूहि तोमरेहिच
नेव तेंसं पकुप्पेय्यं सीलखण्डभया ममाति ॥ १० ॥

जर त्यांनी मला तेथे फरशीने अथवा अंकुशाने कुटले असते तरीसुद्धा मी शील नष्ट होण्याच्या भीतीने त्यांच्यावर रागावलो नसतो. ॥ १० ॥

□□

## २. भूरिदत्तचरियं (२. भूरिदत्त चर्या)

पुनापरं यदा होमि भूरिदत्तो महिद्धिको
विरूपक्खेन महारञ्ञा देवलोकमगच्छहं ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी महासामर्थ्यशाली भूरिदत्त (नामक साप) झालो, तेव्हा मी विरूपाक्ष महाराजाबरोबर देवलोकात गेलो. ॥ १ ॥

तत्थ पस्सित्वाहं देवे एकन्तं सुखसमप्पिते
तं मग्गं गमनत्थाय सीलब्बतं समादयिं ॥ २ ॥

तेथे आत्यंतिक सुखात रत झालेल्या देवांना पाहून त्या मार्गाने जाण्याकरिता शीलव्रत ग्रहण केले. ॥ २ ॥

सरीरकिच्चं कत्वान भुत्वा यापनमत्तकं
चतुरो अङ्गे अधिट्ठाय सेमि वम्मिकमुद्धनि ॥ ३ ॥

शरीर कृत्य करून निर्वाहापुरते खाऊन चार गोष्टींवर लक्ष केंद्रित करून मी वारुळाच्या माथ्यावर झोपत असे. ॥ ३ ॥

छविया चम्मेन मंसेन नहारु- अट्ठिकेहि'च
यस्सएतेन करणीयं दिन्नं येव हरातु सो ॥ ४ ॥

कातडी, चामडे, मांस, स्नाविर (शिरा) आणि हाडे यांची ज्याला आवश्यकता असेल त्याने ते घेऊन जावे; ते दिले आहे. ॥ ४ ॥

संसितो अकतञ्ञुना आलम्बानो ममग्गहि
पेलाय पक्खिपित्वान कीलेति मं तहिं तहिं ॥ ५ ॥

अकृतज्ञ (पारधी ब्राह्मणाने) प्रशंसा केल्यामुळे आलंबन नावाच्या (एका) गारुड्याने मला पकडले व पेटाऱ्यात ठेवून तो मला ठिकठिकाणी खेळवीत असे. ॥ ५ ॥

पेलाय पक्खिपन्तेपि सम्मद्दन्तेपि पाणिना
आलम्बाने न कुप्पामि सीलखण्डभया मम ॥ ६ ॥

पेटाऱ्यात टाकतांनासुद्धा, हाताने थापट्या मारीत असतांना सुद्धा शील खण्डित होईल ह्या भीतीने मी ह्या आलंबनावर क्रोधित झालो नाही. ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

सकजीवितपरिच्चागो तिणतो लहुको मम
सीलवीतिक्कमो मय्हं पठवी-उप्पत्तना विय ॥ ७ ॥

स्वतःच्या जीविताचा त्याग मला गवतापेक्षाही क्षुद्र (हलका) भासत होता, परंतु, शीलाचे अतिक्रमण मला पृथ्वीच्या उलटपालटीप्रमाणे (भारी भासत) होते. ॥ ७ ॥

निरन्तरं जातिसतं चजेय्यं मम जीवितं
नेव सीलं पभिन्देय्यं चतुदीपान हेतु पि ॥ ८ ॥

सतत शंभर जन्मापर्यंत मी आपले जीविताचा त्याग करीन परंतु चारही द्विपांच्या (प्रलोभनानेही) शील (व्रत) भंग होऊ देणार नाही. ॥ ८ ॥

अपि चाहं सीलरक्खाय सीलपारमिपूरिया
न करोमि चित्ते अञ्ञथत्तं पक्खिपन्तम्पि पेलके'ति ॥ ९ ॥

इतकेच नव्हे तर मी शील रक्षण करण्याकरिता, शील पारमिता पूर्ण करण्याकरिता (गारुड्याने) पेटाऱ्यात टाकतांनासुद्धा चित्तात विकार येऊ दिला नाही. ॥ ९ ॥

□□

अनुक्रमणिका

# ३. चम्पेय्यनाग चरियं (३. चंपेय्यनाग चर्या)

पुनापरं यदा होमि चम्पेय्यको महिद्धिको
तदापि धम्मिको आसिं सीलब्बतसमप्पितों ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी महासामर्थ्यशाली चंपेय्यक (नावाचा साप) झालो; तेव्हासुद्धा मी धार्मिक व शीलव्रतांमध्ये तल्लीन होतो. ॥ १ ॥

तदापि मं धम्मचारिं उपवुत्थं उपोसथं
अहिगुण्डिको गहेत्वान राजद्वारम्हि कीलति ॥ २ ॥

त्यावेळी सुद्धा धम्माचे आचरण करण्याऱ्या व उपोसथ व्रत करणाऱ्या मला एक गारुडी पकडून राजद्वांरात खेळवीत होता. ॥ २ ॥

यं सो वण्णं चिन्तयति नीलपीतं व लोहितं
तस्स चित्तानुवत्तन्तो होमि चिन्तितसन्निभो ॥ ३ ॥

तो जो निळा, पिवळा अथवा लाल रंग मनात आणीत असे त्याच रंगाचा त्याच्या मनाप्रमाणे वागणारा मी होत असे. ॥ ३ ॥

थलं करेय्यं उदकं उदकम्पि थलं करे
यदिहं तस्स पकुप्पेय्यं खणेन छारिकं करे ॥ ४ ॥

मी जमिनीचे पाणी व पाण्याची जमीन करीत असे. जर मी त्याच्यावर रागावलो असतो तर त्याची एक क्षणात राखरांगोळी केली असती. ॥ ४ ॥

यदि चित्तवसी हेस्सं परिहायिस्सामि सीलतो
सीलेन परिहीनस्स उत्तमत्थो न सिज्झति ॥ ५ ॥

जर मी चित्ताच्या आधीन झालो असतो तर शीलापासून वंचित झालो असतो. शीलापासून वंचित झालेल्यांचा परमार्थ सिद्ध होत नाही. ॥ ५ ॥

कामं भिज्जतुयं कायो इधेव विकिरीयतु
नेवं सीलं पभिन्देय्यं विकिरन्ते भुसं विया ति ॥ ६ ॥

हे शरीर भग्न होवो, ते येथेच अस्ताव्यस्त पसरो असे एकवेळ मानीन, पण (वाऱ्याबरोबर) वाहणाऱ्या भुश्याप्रमाणे मी हे शील भंग होऊ देणार नाही. ॥ ६ ॥

□□

अनुक्रमणिका

# ४. चूलबोधिचरियं (४. चूलबोधिचर्या)

पुनापरं यदा होमि चूलबोधि सुसीलवा
भवं दिस्वान भयतो नेक्खम्मं अभिनिक्खमिं ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी शीलवान चुलबोधि झालो तेव्हा संसार भयानक पाहून गृहत्याग करून बाहेर पडलो. ॥ १ ॥

या मे दुतियिका आसि ब्राह्मणी कनकसन्निभा
सा पि वट्टे अनपेक्खा नेक्खम्मं अभिनिक्खमि ॥ २ ॥

जी माझी सुवर्णवर्णाची ब्राह्मण पत्नी होती ती सुद्धा संसारापासून अनासक्त होऊन गृहत्याग करून बाहेर पडली. ॥ २ ॥

निरालया छिन्नबन्धू अनपेक्खा कुले गणे
चरन्ता गाम निगमं वाराणसिमुपागमुं ॥ ३ ॥

(आम्ही दोघेही) अनासक्त होऊन बांधवापासून नाते तोडून कुळ व (तापस) गणाप्रती अनपेक्ष होऊन गाव व शहरातून विचरण करीत वाराणसीला आलो. ॥ ३ ॥

तत्थ वसाम निपका असंसट्ठा कुले गणे
निराकुले अप्पसद्दे राजुय्याने वसामुभो ॥ ४ ॥

तेथे आम्ही दोघे बुद्धिमान कुळ व (तापस) गणाशी संसर्गरहित अनासक्त होऊन शांत (अल्पशब्द) अशा राजोद्यानात राहत होतो. ॥ ४ ॥

उय्यानदस्सनं गन्त्वा राजा अद्दस ब्राह्मणिं
उपगम्म ममं पुच्छि तुय्हेसा का कस्स भरिया' ति ॥ ५ ॥

उद्यान दर्शनाला जाऊन राजाने ब्राह्मणीला पाहिले, माझ्याजवळ येऊन मला विचारले, 'ही तुमची कोण लागते? कोणाची पत्नी आहे?' ॥ ५ ॥

एवं वुत्ते अहं तस्स इदं वचनब्रविं
न मय्हं भरिया एसा सहधम्मा एकसासनी ॥ ६ ॥

असे विचारल्यावर मी त्याला असे म्हटले 'ही माझी पत्नी नाही. ही सहधर्मिणी (समान धर्म पालन करणारी) व समान सांप्रदायात राहणारी आहे.' ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

तस्सा सारत्त-गधितो गाहापेत्वान चेटके
निप्पीलयन्तो बलसा अन्तेपुरं पवेसयि ॥ ७ ॥

तिच्यावर अतिशय आसक्त होऊन राजपुरुषाकडून तिला पकडून, तिचे हाल करून जबरदस्तीने अंतःपुरात पाठविले. ॥ ७ ॥

ओदपत्तकिया मय्हं सहजा एकसासनी
आकङ्ढित्वा नयन्तिया कोपो मे उपपज्ञथ ॥ ८ ॥

एकाच वेळी प्रव्रजित झालेल्या, एकाच सांप्रदायात राहणाऱ्या, पाण्याच्या भांड्याला स्पर्श करण्याच्या (विधीने विवाहबद्ध झालेल्या) माझ्या पत्नीला ओढून नेत असता मला क्रोध उत्पन्न झाला. ॥ ८ ॥

सह कोपे समुप्पन्ने सीलब्बतमनुस्सरिं
तत्थेव कोपं निग्गण्हिं नादासि वड्ढितूपरि ॥ ९ ॥

क्रोध उत्पन्न झाल्याबरोबर मी शील-व्रताचे स्मरण केले. क्रोध तेथेच दाबून टाकला. वर वाढू दिला नाही. ॥ ९ ॥

यदि नं ब्राह्मणिं कोचि कोट्टेय्य तिण्हसत्तिया
नेव सीलं पभिन्देय्यं बोधिया येव कारणा ॥ १० ॥

जर त्या ब्राह्मणीला कोणी तीक्ष्ण शस्त्राने कापले तरीसुद्धा, बोधिच्या (प्राप्तीत अडथळा येऊ नये म्हणून) मी माझे शील भंग करणार नाही. ॥ १० ॥

न मे सा ब्राह्मणी देस्सा नपि मे बलं न विज्जति
सब्बञ्ञुतं पियं मय्हं तस्मा सीलानुरक्खिस्सं ति ॥ ११ ॥

ब्राह्मणी (माझ्या पत्नी) चा मी द्वेष करीत होतो असे नव्हे अथवा माझ्यात सामर्थ्य नव्हते असेही नाही. मला सर्वज्ञता प्रिय आहे. त्यामुळे मी शीलाचे पालन करीन. ॥ ११ ॥

□□

अनुक्रमणिका

## ५. महिंसराज–चरियं (५. महिंसराज चर्या)

पुनापरं यदा होमि महिंसो वनचारिको
पवड्ढकायो बलवा महन्तो भीमदस्सनो ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी महाकाय, बलशाली, महान व भयानक असा अरण्यात राहणारा रेडा होतो. ॥ १ ॥

पब्भारे गिरिदुग्गे च रूक्खमूले दकासये
होतेत्थ ठानं महिंसानं कोचि तहिं तहिं ॥ २ ॥

पर्वतांच्या पुढे आलेल्या निरालम्ब छताखाली पर्वतांच्या दुर्गम (कपारीमध्ये), झाडाखाली जलाशयाजवळ अशीच कोठे कोठे रेड्याकरिता निरनिराळी ठिकाणे असतात. ॥ २ ॥

विचरन्तो ब्रहारञ्ञे ठानं अद्दस भद्दकं
तं ठानं उपगन्त्वान तिट्ठामि च सयामि च ॥ ३ ॥

त्या महान अरण्यात विचरण करीत असता एक सुन्दर ठिकाण मी पाहिले. त्या ठिकाणी जाऊन मी उभा रहात असे, व झोपत असे. ॥ ३ ॥

अथेत्थ कपिमागन्त्वा पापो अनरियो लहु
खन्धे नलाटे भमुके मुत्तेति ओहनेति तं ॥ ४ ॥

तेथे एक पापी, अशिष्ट (अनार्य) चंचल माकड येऊन ते माझ्या खांद्यावर, कपाळावर, भुवयावर मलमूत्र टाकीत असे. ॥ ४ ॥

सकिम्पि दिवसं दुतियं ततियं चतुत्थम्पि च
दूसेति मं सब्बकालं तेन होमि उपद्दुतो ॥ ५ ॥

नेहमीच दिवसातून एकदा, दोनदा, तीनदा, चारदासुद्धा ते माझे (अंगावर) घाण टाकीत असे, त्यामुळे मी त्रस्त झालो होतो. ॥ ५ ॥

ममं उपद्दुतं दिस्वा यक्खो मं इदमब्रबि
नासेहेतं छवं पापं सिगेहि च खुरेहि च ॥ ६ ॥

त्रस्त झालेल्या मला पाहून (एक) यक्ष मला म्हणाला 'त्या पापी मुडदाराला शिंगांनी व खुरांनी नष्ट कर.' ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

एवं वुत्ते तदा यक्खे अहं तं इदमब्रविं
किं त्वं मक्खेसि कुणपेन पापेन अनरियेन मं ॥ ७ ॥

तेव्हा यक्षाने असे म्हटल्यावर मी त्याला असे म्हटले, ‘तू मला त्या पापी, मुडदार व अशिष्ट माकडावरील (असल्या कृत्याच्या पापाने) का माखीत आहेस?’ ॥ ७ ॥

यदिहं तस्स कुप्पेय्यं ततो हीनतारो भवे
सीलञ्च मे पभिज्जेय्य ब्रिञ्ञू च गरहेय्युं मं ॥ ८ ॥

जर मी त्याच्यावर क्रोधित झालो तर मी त्याच्यापेक्षाही हीन (नीच) होईन, माझे शील भंग होईल व ज्ञानी लोक माझी निंदा करतील. ॥ ८ ॥

हीलिता जीविता वापि परिसुद्धेन मतं वरं
क्याहं जीवितहेतू पि काहामि परहेठनं ॥ ९ ॥

हीन (नीच) जीवितापेक्षा शुद्ध राहून मरणे श्रेष्ठ आहे. मी आपल्या जीवितासाठी दुसऱ्याला कशी पीडा देऊ? ॥ ९ ॥

मं एवायं मञ्ञमानो अञ्ञे पेवं करिस्सति
तेव तत्थ वधिस्सन्ति सा मे मुत्ति भविस्सति ॥ १० ॥

हा मीच आहे असे समजून दुसऱ्याला सुद्धा असेच करील (त्रास देईल). तेच त्याला तिथे मारतील. त्यामुळे माझी सुटका होईल. ॥ १० ॥

हीनमज्झिमडक्कट्ठे सहन्तो अवमानितं
एवं लभति सप्पञ्ञो मनसा यथा पत्थितं ति ॥ ११ ॥

हीन मध्यम आणि उत्कृष्ट अशांकडून झालेला अपमान सहन करीत प्रज्ञावान (ज्ञानी) माणूस अशाप्रकारे इच्छिलेले प्राप्त करतो. ॥ ११ ॥

□□

अनुक्रमणिका

## ६. रुरुराज-चरियं (६. रुरुराजा-चर्या)

पुनापरं यदा होमि सुतत्तकनकसन्निभो
मिगराजा रुरुनाम परमसील समाहितो ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी परमशीलयुक्त व चांगल्या प्रकारे तापविलेल्या सोन्याप्रमाणे (रंग असलेला) रुरु नावाचा मृगराज होतो. ॥ १ ॥

रम्मे पदेसे रमणीये विवित्ते अमनुस्सके
तत्थ वासं उपागच्छिं गङ्गाकूले मनोरमे ॥ २ ॥

तेव्हा गंगेच्या मनोरम किनाऱ्यावर, सुंदर, रमणीय, एकान्त, निर्जन प्रदेशात राहत होतो. ॥ २ ॥

अथ उपरि गङ्गाय धनिकेहि परिपीळितो
पुरिसो गङ्गाय पपति जीवामि वा मरामि वा ॥ ३ ॥

तेव्हा धनिकांकडून पीडित अशा एका मनुष्याने गंगेच्या वरच्या भागात ‘जिवंत राहो अथवा मरो’ (असा विचार करून) गंगेत उडी घेतली. ॥ ३ ॥

रत्तिं दिवं सो गङगाय वुय्हमानो महोदके
रवन्तो करूणं रवं मज्झे गङ्गाय गच्छति ॥ ४ ॥

तो गंगेच्या विस्तीर्ण प्रवाहात रांत्रदिवस वाहात करुण आवाज करीत गंगेच्या मध्य (प्रवाहात) गेला. ॥ ४ ॥

तस्साहं सद्दं सुत्वान करुणं परिदेवतो
गङ्गाय तीरे ठत्वान अपुच्छिं कोसि त्वं नरो ॥ ५ ॥

मी त्याच्या रडण्याचा करूण आवाज ऐकून गंगेच्या किनाऱ्यावर उभा राहून (त्याला) विचारले ‘तू कोण मनुष्य आहेस?’ ॥ ५ ॥

सो मे पुट्ठो च व्याकासि अत्तनो कारणं तदा
धनिकेहि भीती तसितो पक्खन्तोहं महानदिं ॥ ६ ॥

तेव्हा मी विचारल्यावर त्याने आपले (गंगेत उडी घेण्याचे) कारण सांगितले धनिकांकडून भयभीत, त्रस्त होऊन मी (या) महानदीत उडी घेतली. ॥ ६ ॥

तस्स कत्वान कारुञ्ञं चजित्वा मम जीवितं
पविसित्वा नीहरिं तस्स अन्धकारम्हि रत्तिया ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

मी त्याच्यावर करूणा करून व माझे जीवित त्यागून (जीविताची पर्वा न करता), त्या रात्रीच्या अंधारात (पाण्यात) प्रवेश करून त्याला बाहेर काढले. ॥ ७ ॥

अस्सत्त कालमञ्ञाय तस्साहमिदमब्रविं
एकंतं वरं याचामि मा मं कस्सचि पावद ॥ ८ ॥

(तो) स्वस्थ झालेला पाहून मी त्याला असे म्हटले, ‘मी तुला एक वर मागतो-तू माझ्याविषयी कोणाला सांगू नकोस.’ ॥ ८ ॥

नगरं गन्त्वान आचिक्खि पुच्छितो धनहेतुको
राजानं सो गहेत्वान उपगच्छि ममन्तिकं ॥ ९ ॥

त्याने नगरात जाऊन विचारल्यावर धनाच्या हेतूने सांगितले (आणि) राजाला घेऊन तो माझ्याकडे आला. ॥ ९ ॥

यावता कारणं सब्बं रञ्ञो आरोचितं मया
राजा सुत्वान वचनं उसुं तस्स पकप्पयि
इधेव घातयिस्सामि मित्तदुब्भिमनारियं ॥ १० ॥

जे कारण होते ते सर्व (वृत्त) मी राजाला सांगितले, राजाने माझे वचन ऐकून त्याच्यावर बाण रोखला ‘मित्रद्रोही, अनार्य अशा या माणसाला इथेच ठार करीन.’ ॥ १० ॥

तमहं अनुरक्खन्तो निम्मिनिं मम अत्तना
तिट्ठतेसो महाराज! कामङ्क रो भवामि ते ॥ ११ ॥

मी त्याचे रक्षण करताना स्वतःच त्याच्या जागी उभा राहिलो (व म्हणालो) ‘महाराज! ह्याला राहू द्या, मी आपल्या इच्छा परिपूर्ण करीन.’ ॥ ११ ॥

अनुरक्खिं मम सीलं नारक्खिं मम जीवितं
सीलवा ही तदा आसिं बोधिया एव कारणा ॥ १२ ॥

मी माझ्या शीलाचे रक्षण केले, माझ्या जीविताचे रक्षण केले नाही. बोधिच्याच कारणासाठी मी त्यावेळी शीलवान होतो. ॥ १२ ॥

□□

अनुक्रमणिका

# ७. मातङ्ग चरियं (७. मातङ्ग चर्या)

पुनापरं यदा होमि जटिलो उग्गतापसो
मातङ्गो नाम नामेन सीलवा सुसमाहितो ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी शीलवान, एकाग्र चित्त, जटाधारी मातंग नावाचा महातपस्वी होतो, ॥ १ ॥

अहं च ब्राह्मणो एको गङ्गाकूले वसामुभो
अहं वसामि उपरि, हेट्ठा वसति ब्राह्मणो ॥ २ ॥

तेव्हा मी आणि एक ब्राह्मण आम्ही दोघे गंगेच्या किनाऱ्यावर राहत होतो. मी वर राहत होतो व ब्राह्मण खाली (खालच्या भागावर) राहत होता. ॥ २ ॥

विचरन्तो अनुकूलम्हि उद्धं मे अस्समद्दस
तत्थ मं परिभासेत्वा अभिसपि मुद्धफालनं ॥ ३ ॥

(तो ब्राह्मण) किनाऱ्यावर फिरत असताना त्याने वर (वरच्या भागावर असलेला) माझा आश्रम पाहिला तेथे मला शिव्या देऊन 'तुझे डोके फुटेल' असा शाप दिला. ॥ ३ ॥

यदिहं तस्स कुप्पेयं यदि सीलं न गोपये
ओलोकेत्वानहं तस्स करेय्यं छारिकं विय ॥ ४ ॥

जर मी त्याच्यावर रागावलो असतो, (अथवा) जर शीलाचे रक्षण केले नसते, तर मी त्याच्याकडे फक्त पाहून त्याला भस्मसात केले असते. ॥ ४ ॥

यं सो तदा मं अभिसपि कुंपितो दुट्ठमानसो
तस्सेव मत्थके निपति योगेन तं पमोचयिं ॥ ५ ॥

त्यावेळी क्रोधित होऊन दुष्टमनाने त्याने मला शाप दिला तो त्याच्याच डोक्यावर पडला परंतु मी त्याची युक्तीने सुटका केली. ॥ ५ ॥

अनुरक्खिं मम सीलं नारक्खिं मम जीवितं
सीलवा हि तदा आसिं बोधिया येव कारणा ॥ ६ ॥

मी माझ्या शीलाचे रक्षण केले, माझ्या जीविताचे रक्षण केले नाही. बोधिच्याच, कारणासाठी (परमज्ञान प्राप्तीसाठी) मी त्यावेळी शीलवान होतो. ॥ ६ ॥

□□

## ८. धम्मदेवपुत्त–चरियं (८. धम्मदेव पुत्र चर्या)

पुनापरं यदा होमि महापक्खो महिद्धिको
धम्मो नाम महायक्खो सब्बलोकानुकम्पको ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी सर्व लोकावर अनुकम्पा करणारा महासामर्थ्यशाली 'धम्म' नावाचा महायक्ष होतो, ॥ १ ॥

दसकुसलकम्मपथे समादपेन्तो महाजनं
चरामि गामनिगमं समित्तो सपरिज्ञनो ॥ २ ॥

तेव्हा मी आपल्या मित्रांसह व परिवारासह लोकांना दहा कुशल कर्म पथ ग्रहण करायला सांगून गाव व शहरातून विचरण करीत असे. ॥ २ ॥

पापो कदरियो यक्खो दीपेन्तो दस पापके
सो पेत्थे महिया चरति समित्तो सपरिज्ञनो ॥ ३ ॥

'पापी', कंजूण यक्ष सुद्धा आपल्या मित्रांसह व परिवारासह दहा पापकारक गोष्टी सांगत या पृथ्वीवर विचरण करीत होता. ॥ ३ ॥

धम्मवादी अधम्मो च उभो पच्चनिका मयं
धुरे धुरं घट्टयन्ता समिम्हा पटिपथे उभो ॥ ४ ॥

धम्मवादी व अधर्मी असे एकमेकांचे विरोधक आम्ही दोघे आमच्या वाहनांच्या धुरीला धुरीची टक्कर देऊन, एकाच मार्गावर समोरासमोर भेटलो. ॥ ४ ॥

कलहो वत्तति अस्मा कल्याणपापकस्स च
मग्गा ओक्कमनत्थाय महायुद्धो उपट्ठितो ॥ ५ ॥

(एक) कल्याण व (दुसरा) पापक अशा आमच्यामध्ये भांडण होऊ लागले. मार्गातून बाजूला होण्याकरिता महायुद्ध उपस्थित झाले. ॥ ५ ॥

यदिहं तस्स पकुप्पेय्यं यदि भिन्दे तपोगुणं
सह परिजनं तस्स रजभूतं करेय्यहं ॥ ६ ॥

जर मी त्याच्यावर क्रोधित झालो असतो अथवा जर मी (माझ्या) तपोगुणांना तोडले असते, तर मी त्याला त्याच्या परिजनासह धुळीला मिळविले असते. ॥ ६ ॥

अपि चाहं सील-रक्खाय निब्बापेत्वान मानसं
सह जनेन ओक्कमित्वा पथं पापस्सदासहं ॥ ७ ॥

परंतु मी शील रक्षणाकरिता मन शांत करून आपल्या परिजनासह मार्गातून बाजूला सरून मी त्या पाप्याला मार्ग दिला. ॥ ७ ॥

सह पथतो ओक्कन्तो कत्वा चितस्स निब्बुतिं
विवरं अदासि पठवी पापयक्खस्स तावदे ति ॥ ८ ॥

चित्त शांत करून मार्गावरून बाजूला झाल्याबरोबर त्याचक्षणी पापी यक्षाकरिता पृथ्वीने विवर दिले. (पृथ्वी दुभंगली व त्यात पापी यक्ष गाडला गेला.) ॥ ८ ॥

□□

# ९. अलीनसत्त-चरियं (९. अलीनसत्त चर्या)

पञ्चालरट्ठे नगरे कपिलायं पुरुत्तमे
राजा जयद्दिसो नाम सीलगुणमुपागतो ॥ १ ॥

पांचाल राष्ट्रातील कपिला या उत्तम नगरीत शीलगुणसंपन्न असा जयद्दिस नावाचा राजा होता. ॥ १ ॥

तस्स रञ्ञो अहं पुत्तो सुतधम्मो सुसीलवा
अलीनसत्तो गुणवा अनुरत्त-परिज्जनो ॥ २ ॥

मी त्या राजाचा बहुश्रुत शीलवान, गुणवान व आपल्या लोकांचे प्रेम संपादन करणारा अलीनसत्त नावाचा पुत्र होतो. ॥ २ ॥

पिता मे मिगवं गन्त्वा पोरिसादमुपागमि
सो मे पितुमग्गहेसि भक्खोसि मम मा चलि ॥ ३ ॥

माझे वडील शिकारीला गेल्यावर त्यांची मनुष्य भक्षक यक्षाशी गाठ पडली. त्याने माझ्या वडिलांना पकडले 'तू माझे भक्ष्य आहेस, हलू नकोस.' ॥ ३ ॥

तस्स तं वचनं सुत्वा भीतो तसित वेधितो
ऊरुक्खम्भो अहु तस्स दिस्वान पोरिसादकं ॥ ४ ॥

त्याचे ते वचन ऐकून ते भयभीत व त्रस्त होऊन थरथर कापू लागले. त्या मनुष्य भक्षक यक्षाला पाहून त्यांचे पाय (मांड्या) ताठरून गेले. ॥ ४ ॥

मिगवं गहेत्वा मुञ्चस्सु कत्वा आगमनं पुन
ब्राह्मणस्स धनं दत्वा पिता आमन्तयि ममं ॥ ५ ॥

(वडील म्हणाले) 'शिकार घेऊन मला पुनः येण्याची प्रतिज्ञा करवून सोडून द्या, ब्राह्मणाला धन देऊन वडिलांनी मला बोलाविले. ॥ ५ ॥

रज्जं पुत्त पटिपज्ज मा पमज्जि पुरं इदं
कतं मे पोरिसादेन मम आगमनं पुन ॥ ६ ॥

'हे मुला! राज्य सांभाळ या नगरीच्या बाबतीत प्रमाद करू नकोस. मी पुनः येण्याचे त्या मनुष्य भक्षक यक्षाला वचन दिले आहे. ॥ ६ ॥

मातापितू च वन्दित्वा निम्मिनित्वान अत्तानं
निक्खिपित्वा धनुखग्गं पोरिसादं उपागमिं ॥ ७ ॥

(वडिलांचे हे शद्ब ऐकून) मी स्वतः आई आणि वडिलांना वंदन करून स्वतःला तयार करून धनुष्य व तलवार फेकून नरभक्षक यक्षाकडे गेलो. ॥ ७ ॥

स-सत्थ-हत्थूपगतं कदाचि सो तसिस्सति
तेन भिज्जिस्सति सीलं परित्तासं कते मयि ॥ ८ ॥

हातात शस्त्र असलेले पाहून कदाचित तो भयभीत होईल व अशारीतीने मी त्याला भिवविले तर माझे शील भंग पावेल. ॥ ८ ॥

सीलखण्डभया मय्हं तस्स देस्सं न व्याहरिं
मेत्तचित्तो हितवादी इदं वचनमब्रविं ॥ ९ ॥

माझे शील भंग होण्याच्या भीतीने मी त्याला अप्रिय असे काही बोललो नाही. मैत्री चित्त व हितचिंतक असा मी असे बोललो. ॥ ९ ॥

उज्जलेहि महाअग्गिं पपतिस्सामि रुक्खतो
पक्क कालमञ्ञाय भक्खय त्वं पितामह ॥ १० ॥

हे थोरले बाबा (काका)! मोठा अग्नी पेटवा मी झाडावरून (खाली) उडी मारतो मी चांगला शिजला गेलो आहे असे जाणून तुम्ही मला खा. ॥ १० ॥

इति सीलवतं हेतु नारक्खिं मम जीवितं
पब्बाजेसिं चहं तस्स सदा पाणातिपातिकं ॥ ११ ॥

अशाप्रकारे शीलब्रताचे रक्षण व्हावे म्हणून मी माझ्या जीविताचे रक्षण केले नाही (या उलट) मी त्या नेहमीच जीवंहिंसा करणाऱ्या यक्षाला प्रव्रजित केले. ॥ ११ ॥

□□

अनुक्रमणिका

## १०. सङ्खपाल-चरियं (१०. शंखपालचर्या)

पुनापरं यदा होमि सङ्खपालो महिद्धिको
दाठावुधो घोरविसो द्विजिव्हो उरगाधिभू ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी दातांचे शस्त्र असलेला, अत्यंत विषारी, दोन जीभा असलेला, महान सामर्थ्यशाली शंखपाल नावाचा सापांचा राजा होतो, ॥ १ ॥

चतुप्पथे महामग्गे नानाजन समाकुले
चतुरो अङ्गे अधिट्ठाय तत्थ वासमकप्पयिं ॥ २ ॥

तेव्हा मी महामार्गावरील चौरस्त्यावर जेथे निरनिराळे लोक एकत्र येत होते तेथे चार गोष्टींवर लक्ष केंद्रित करून राहत असे. ॥ २ ॥

छविया चम्मेन मंसेन नहारूअट्ठिकेहि वा
यस्स एतेन करणीयं दिन्नं येव हरातु सो ॥ ३ ॥

त्वचा, कातडी, मांस, स्नाविर [टीप--ह्या शब्दाकरिता ईशावस्योपनिषद् (८) पहा. शिक्षासमुच्चय (पृ. २०९) व अर्थ विनिश्चयसूत्र (पृ. २४, ४१) ह्या ग्रन्थांत स्नायु व शिरा असे दोन स्वतंत्र शब्द आहेत. त्याचप्रमाणे महाव्युत्पत्ति कोशात (३९८९-९०) नहरु (पालि-नहारु) व स्नायु हे दोन स्वतंत्र शब्द आहेत. पालि ग्रंथातून 'नहारु' हा एकच शब्द स्नायु व स्नाविर ह्याबद्दल ढोबळमानाने वापरलेंला दिसतो.] अथवा हाडे यांचे ज्याला काम आहे ते त्याला दिले आहे त्याने ते घेऊन जावे. ॥ ३ ॥

-अद्दसंसु भोजपुत्ता खरा लुद्दा अकारुणा
उपगच्छुं ममं तत्थ दण्डमुग्गरपाणिनो ॥ ४ ॥

क्रूर, भयानक व निर्दयी पारध्यांच्या मुलांनी मला पाहिले व ते हातात काठी व मोगरी घेऊन माझ्याजवळ आले. ॥ ४ ॥

नासाय विनिविज्झित्वा नङ्गुट्ठे पिट्ठिकण्टके
काजे आरोपयित्वान भोजपुत्ता हरिंसु मं ॥ ५ ॥

नाक, शेपटी व पाठीचा कणा ह्यात भोके पाडून (दोरीने बांधून) कावडीवर टाकून पारध्यांच्या मुलांनी मला नेले. ॥ ५ ॥

ससागरन्तं पठविं सकाननं सपब्बतं
इच्छमानो च'हं तत्थ नासवातेन झापये ॥ ६ ॥

जर मी इच्छा केली असती तर नाकातील वायूने सागरापर्यंतची ही पृथ्वी अरण्य व पर्वतासह जाळली असती. ॥ ६ ॥

सूलेहि विज्झयन्तेपि कोट्टयन्तेपि सत्तिभि
भोजपुत्ते न कुप्पामि एसा मे सीलपारमी’ति ॥ ७ ॥

परंतु सुळांनी टोचतांना व भाल्याने कुटतांनासुद्धा मी पारध्यांच्या मुलांवर क्रोधित झालो नाही. ही माझी शील-पारमिता होती. ॥ ७ ॥

**उद्दानं/उद्दानं**

हत्थिनागो भूरिदत्तो चम्पेयो बोधिमहिंसो
रूरू मातङ्गो धम्मो च अत्रजो च जयद्दिसो ॥ ८ ॥

हत्तीनाग, भूरिदत्त, चम्पेय्य (चूल) बोधि, महिस (राज), रुरु, मातंग, धम्म आणि जयद्दिस—पुत्र ॥ ८ ॥

एते नव सीलबला परिक्खारा पदेसिका
जीवितं परिरक्खित्वा सीलानि अनुरक्खिस्सं ॥ ९ ॥

ह्या नऊ पारमिता शील सामर्थ्याच्या असल्या तरी (उच्च) पारमितेची परिष्कार-अंगे व अंशिक आहेत (कारण यामध्ये) मी जीविताचे रक्षण करून शील पालन केले आहे. ॥ ९ ॥

सङ्खपालस्स मे सतो सब्बकालम्पि जीवितं
यस्स कस्सचि निय्यत्तं तस्मा सा सीलपारमी’ति ॥ १० ॥

पण मी शंखपाल असताना सर्व वेळी माझे जीवित ज्या कोणाला पाहिजे होते त्याला दिलेले होते म्हणून ही (उच्च) शीलपारमिता आहे. ॥ १० ॥

शीलपारमिता परिच्छेद समाप्त

□□

अनुक्रमणिका

# ततियो परिच्छेदो/तिसरा परिच्छेद

## नेक्खम्मपारमिता/नैष्क्रम्य-पारमिता

### १. युधञ्जय-चरियं (१. युधञ्जय चर्या)

यदाहं अमितयसो राजपुत्तो युधञ्जयो
उस्सावबिन्दुं सुरियातपे पतितं दिस्वान संविजि ॥ १ ॥

जेव्हा मी अपरिमित यश प्राप्त युधञ्जय नावाचा राजपुत्र होतो तेव्हा सूर्याच्या उन्हात पडलेला दवबिंदू पाहून (अनित्यतेच्या विचाराने) मला संवेग प्राप्त झाला. ॥ १ ॥

तञ्ञेवाधिपतिं कत्वा संवेगमनुब्रूहयिं
मातापितू च वन्दित्वा पब्बज्जमनुयाचहं ॥ २ ॥

तेच मुख्य निमित्त मानून मी संवेग वाढविला आणि आई-वडिलांना वन्दन करून प्रव्रज्या घेण्याकरिता याचना (विनंती) केली. ॥ २ ॥

याचन्ति मं पञ्जलिका सनेगमा सरट्ठका
अज्जेव पुत्त पटिपज्ज इद्धं फीतं महामहिं ॥ ३ ॥

शहरातील, राष्ट्रातील सर्व लोक मला याचना करीत होते (तुम्ही येथेच राहा) त्याचप्रमाणे (आई-वडील) म्हणत होते 'हे मुला! आज ह्या वृद्धी-प्राप्त व भरभराटीला आलेल्या पृथ्वीचा स्वीकार कर. ॥ ३ ॥

सराजके सहोरोधे सनेगमे सरट्ठके
करूणं परिदेवन्ते अनपेक्खो हि पब्बजिं ॥ ४ ॥

राजा, राणी वंशातील स्त्रिया, शहर व राष्ट्रातील लोक करुणेने रडत असताना मी अनपेक्ष होऊन प्रव्रज्या घेतली. ॥ ४ ॥

केवलं पठविं रज्जं ञातिपरिजनं यसं
चजमानो न चिन्तेसिं बोधिया येव कारणा ॥ ५ ॥

संपूर्ण पृथ्वीचे राज्य नातलग-परिवार आणि यशाचा त्याग करून मी बोधिच्याच कारणाने त्यांची चिंता वाहिली नाही. ॥ ५ ॥

माता पिता न मे देस्सा नपि मे देस्सं महायसं
सब्बञ्ञुतं पियं मय्हं तस्मा रज्जं परिच्चजिं ति ॥ ६ ॥

माझ्या आई-वडिलांचा मी द्वेष करीत नव्हतो. महायशाचा सुद्धा द्वेष केला नाही. मला सर्वज्ञता प्रिय होती त्यामुळे मी राज्याचा त्याग केला. ॥ ६ ॥

□□

## २. सोमनस्स-चरियं (२. सोमनस्स चर्या)

पुनापरं यदा होमि इन्दपत्थे पुरुत्तमे
कामितो दयितो पुत्तो सोमनस्सो'ति विस्सुतो ॥ १ ॥

सीलवा गुणसम्पन्नो कल्याणपटिभानवा
वुड्ढापचायी हिरीमा सङ्गहेसु च कोविदो ॥ २ ॥

पुनः नंतर जेव्हा मी उत्तम इंद्रप्रस्थ नगरात आईवडिलांनी इच्छिलेला, प्रियपुत्र, शीलवान, गुणसंपन्न, उत्तम बुद्धिमान, वृद्धांची सेवा करणारा, लज्जाशील व मित्र जोडण्यात चतुर असा सोमनस्स नावाने प्रसिद्ध होतो. ॥ १-२ ॥

तस्स रञ्ञो पतिकरो आसि कुहक-तापसो
आरामं मालागच्छञ्च रोपित्वान सो जीवति ॥ ३ ॥

तेव्हा राजाचा आवडता असा (एक) ढोंगी तपस्वी होता. तो बागा व पुष्प-वाटिका करिता रोपटी तयार करून (त्यावर) जगत होता. ॥ ३ ॥

तमहं दिस्वान कुहकं थुसरासिं व अतण्डुलं
दुमं अन्तो च सुसिरं कदलिं व असारकं ॥ ४ ॥

मी तो तांदूळरहित भुश्याच्या ढिगाप्रमाणे, आत पोकळ असलेल्या झाडाप्रमाणे असार केळीप्रमाणे, (निरर्थक) ढोंगी (आहे असे) पाहून (मला समजून आले),

नत्थिमस्स सतं धम्मो सामञ्ञापगतो अयं
हिरिसुक्कधम्मजहितो जीवितवुत्तिकारणा ॥ ५ ॥

की, याच्यामध्ये सत्पुरुष धर्म नाही, हा श्रामण्यापासून दूर आहे, याने उदरनिर्वाहाकरिता लज्जारुपी शुक्ल धर्म सोडून दिला आहे. ॥ ४-५ ॥

कुपितो अहोसि पच्चन्तो अटवीहि परन्तिहि
तं निसेधेतुं गच्छन्तो अनुसासि पिता ममं ॥ ६ ॥

जंगलात राहणाऱ्या सीमावर्ती लोकांनी त्यांच्या प्रदेशात बंड केले ते मोडून काढण्याकरिता जाताना माझ्या वडिलाने मला आदेश दिला. ॥ ६ ॥

मा पमज्जि तुवं तात जटिलं उग्गतापनं
यदिच्छकं पवत्तेहि सब्बकामददो हि सो ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

‘हे बाळ! तू त्या उग्रतपस्वी, जटाधारी (साधुच्या) बाबतीत प्रमाद करू नकोस, तो जे इच्छिल ते त्याला दे (कारण) तो सर्व इच्छा पूर्ण करणारा आहे. ॥ ७ ॥

तमहं गन्वानुपट्ठानं इदं वचनमब्रवि
कच्चि ते गहपति कुसलं किं वा ते आहरियतु ॥ ८ ॥

मी त्याच्या सेवेकरिता जाऊन त्याला असे म्हटले ‘हे गृहपति, आपले कुशल आहे ना? आपणाकरिता काय आणवू?’ ॥ ८ ॥

तेन सो कुपितो आसि कुहको माननिस्सितो
घातापेमि तुवं अज्ज रट्ठा पब्बाजयामि वा ॥ ९ ॥

त्या (बोलण्याने) तो अभिमानी व ढोंगी क्रोधित झाला (व म्हणाला) ‘आजच तुला ठार करीन अथवा राष्ट्रातून बाहेर घालवून देईन. ॥ ९ ॥

निसेधयित्वा पच्चन्तं राजा कुहकमब्रवि
कच्चि ते भन्ते खमनीयं सम्मानो ते पवत्तितो
तस्स आचिक्खति पापो कुमारो यथा नासितो ॥ १० ॥

सीमेवरील बंड मोडून राजाने (परत आल्यावर) ढोंगी तपस्व्याला विचारले ‘भन्ते! आपले कुशल आहे ना? आपला सन्मान झाला ना? जेणेकरून कुमाराचा नाश (अंत) होईल असे त्या पाप्याने त्याला उत्तर दिले. ॥ १० ॥

तस्स तं वचनं सुत्वा आणापेसि महीपति
सीसं तत्थेव छिन्दित्वा कत्वान चतुखण्डिकं
रथिया रथियं दस्सेथ सा गति जटिलहीलिता ॥ ११ ॥

त्याचे ते वचन ऐकून राजाने आज्ञा दिली, ‘तेथेच शिरच्छेद करून, चार तुकडे करून रस्त्यारस्त्यातून दाखवा की जटाधारी साधूचा अपमान केल्याने ही गती होते. ॥ ११ ॥

तत्थ कारणिका गन्त्वा चण्डा लुद्दा अकारूणा
मातु अङ्के निसिन्नस्स आकड्ढित्वा नयन्ति मं ॥ १२ ॥

तेव्हा (मी बसलो होतो) तेथे निर्दय, चण्ड, रौद्र (मारेकरी) गेले व आईच्या मांडीवर बसलेल्या मला ओढून नेऊ लागले. ॥ १२ ॥

तेसाहं एवमवचं-बन्धतं गाळहबन्धनं
रञ्ञो दस्सेथ मं खिपं राजकिरियानि अत्थि मे ॥ १३ ॥

मला मजबूत बंधनानी बांधणाऱ्या त्यांना मी म्हटले ‘मला राजाशी ताबडतोब भेटवा कारण मला त्यांच्याशी (काही) कर्तव्य आहे. ॥ १३ ॥

ते मं रञ्ञो दस्सयिंसु पापस्स पापसेविनो
दिस्वान तं सञ्ञापेसिं ममंच वसगानयिं ॥ १४ ॥

पापी तपस्व्याची सेवा करणाऱ्या पापी राजाशी त्यांनी मला भेटविले, त्याला पाहून मी त्याला समजाविले व त्याला वश केले. (माझे म्हणणे त्याला पटवले). ॥ १४ ॥

सो मं तत्थ खमापेसि महारज्जं अदासि मे
सोहं तमं दालयित्वा पब्बजिं अनगारियं ॥ १५ ॥

त्याने तेथे माझ्या क्षमेची याचना केली व मला महाराज्य दिले (परंतु) मी (मोहरुपी) अंधःकार नष्ट करून बेघर करणारी प्रव्रज्या घेतली. ॥ १५ ॥

न मे देस्सं महारज्जं कामभोगो न देस्सियो
सब्बञ्ञुतं पियं मय्हं तस्मा रज्जं परिच्चजिं ति ॥ १६ ॥

मी महाराज्याचा व्देष करीत नव्हतो अथवा कामभोगाबद्दलसुद्धा माझ्या ठिकाणी द्वेष नव्हता. मला सर्वज्ञता प्रिय होती, त्यामुळे मी राज्याचा त्याग केला. ॥ १६ ॥

□□

## ३. अयोघर-चरियं (३. अयोघर चर्या)

पुनापरं यदा होमि कासिराजस्स अत्रजो
अयोघरम्हि संवड्ढो नामेनासि अयोघरो ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी काशीच्या राजाचा पुत्र झालो लोखंडी घरात वाढल्यामुळे माझे नाव अयोघर होते. ॥ १ ॥

दुक्खेन जीवितो लद्धो सम्पीळे पतिपोसितो
'अज्जेव पुत्त पटिपज्ज केवलं वसुधं इमं' ॥ २ ॥

मला मोठ्या कष्टाने जीवन प्राप्त झाले होते. बंदिस्त जागेत राहूनच माझे पालन पोषण होत होते (वडील म्हणाले) 'हे मुला! ह्या संपूर्ण पृथ्वीचे राज्य आजच घे' ॥ २ ॥

सरट्ठकं सनिगमं सजनं वन्दित्वा खत्तियं
अञ्जलिं पग्गहेत्वान इदं वचनमब्रविं ॥ ३ ॥

राष्ट्र, शहर व स्वजनांचा परिवार असलेल्या माझ्या क्षत्रिय (वडिलांना) नमस्कार करून हात जोडून मी असे म्हटले-- ॥ ३ ॥

'ये केचि महिया सत्ता हीनमुक्कट्ठमज्झिमा
निरारक्खा सके गेहे वड्ढन्ति सह ञातिभि ॥ ४ ॥

'पृथ्वीवर जे कोणी हीन, उत्तम, मध्यम प्राणी आहेत ते सर्व संरक्षणरहित, आपल्या नातलगांबरोबर आपल्या घरात वाढतात. ॥ ४ ॥

इदं लोके उत्तरियं सम्पीळे मम पोसनं
अयोघरम्हि संवड्ढो अप्पभे चन्दसुरिये ॥ ५ ॥

परंतु माझे पालन-पोषण बंदिस्त जागेत झाले आहे हे जगात आगळेच आहे. मी चंद्र सूर्याच्या प्रकाशापासून दूर लोखंडी घरात वाढलो आहे. ॥ ५ ॥

पूतिकुणपसम्पुण्णा मुञ्चित्वा मातु कुच्छितो
ततो घोरतरे दुक्खे पुन पक्खित्तयोघरे ॥ ६ ॥

दुर्गन्धीने व घाणीने भरलेल्या आईच्या उदरातून बाहेर आल्यावर मला त्याहीपेक्षा कष्टतर अशा लोखंडी घरात टाकण्यात आले. ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

यदिऽहं तादिसं पत्वा दुक्खं परमदारुणं
रज्जेसु यदि रज्जामि पापानमुत्तमो सिया ॥ ७ ॥

जर मी तशाप्रकारचे अत्यंत दारुण दुःख प्राप्त करून राज्यात आसक्त झालो, तर मी पापी लोकामध्ये श्रेष्ठ (सर्वात नीच) होईन. ॥ ७ ॥

उक्कण्ठितोऽम्हि कायेन रज्जेनऽम्हि अनत्थिको
निब्बुतिं परियेसिस्सं यत्थ मं मच्चु न मद्दिये ॥ ८ ॥

मी शरीराच्या बाबतीत उदासीन आहे; राज्याचा इच्छुक नाही. जेथे मृत्यू माझा नाश (मर्दन) करू शकणार नाही, अशा शांत (निब्बाणाचा) मी शोध घेईन. ॥ ८ ॥

एवाहं चिन्तयित्वान विरवन्तं महाजनं
नागो' व बन्धनं छेत्वा पाविसिं काननं वनं ॥ ९ ॥

मी अशाप्रकारे विचार करून महाजन (मोठा जनसमुदाय) रडत असता, हत्तीप्रमाणे बंधन तोडून अरण्यात प्रवेश केला. ॥ ९ ॥

माता पिता न मे देस्सा नपि मे देस्सं महायसं
सब्बञ्ञुतं पियं मय्हं तस्मा रज्जं परिच्चजिं ति ॥ १० ॥

माझ्या आई-वडिलांचा मी व्देष करीत नव्हतो अथवा महायशाबद्दल सुद्धा माझ्या ठिकाणी व्देष नव्हता. मला सर्वज्ञता प्रिय होती त्यामुळे मी राज्याचा त्याग केला. ॥ १० ॥

□□

अनुक्रमणिका

# ४. भिस-चरियं (४. भिस चर्या)

पुनापरं यदा होमि कासिनं पुरवरुत्तमे
भगिनी भातरो सत्त निब्बत्ता सोत्थिये कुले ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी काशीच्या श्रेष्ठ नगरात (वाराणसीत) सात भाऊ व (एका) बहिणीसह श्रोत्रिय कुळात जन्मलो, ॥ १ ॥

एतेसं पुब्बजो आसिं हिरिसुक्कमुपागतो
भवं दिस्वान भयतो नेक्खम्माभिरतो अहं ॥ २ ॥

तेव्हा मी त्यांच्यामध्ये ज्येष्ठ होतो. लज्जारुपी शुक्ल धर्मयुक्त होतो, मी संसारात भय पाहून नैष्क्रम्यात (गृहत्यागात) रत झालो. ॥ २ ॥

मातापितूहि पहिता सहाया एकमानसा
कामेहि मं निमन्तेन्ति कुलवंसं धारेही ति ॥ ३ ॥

आई वडिलांनी पाठविलेले समान विचार असलेले मित्र कामभोगांचा उपभोग घेण्यास सांगत होते-- 'तू कुल वंश स्थापन कर'. ॥ ३ ॥

यं तेसं वचनं वुत्तं गिहीधम्मे सुखावहं
तं मे अहोसि कठिनं तत्तफालसमं विय ॥ ४ ॥

'गृहस्थ धर्मीयांना सुखावह असलेले त्यांनी म्हटलेले हे वचन मला तापलेल्या (लोखंडी) फाळाप्रमाणे कठीण (कठोर) वाटत होते. ॥ ४ ॥

ते मं तदा उक्खिपन्तं पुच्छिंसु पत्थितं मम
किं त्वं पत्थयसि सम्म यदि कामे न भुञ्जसि ॥ ५ ॥

त्यांचे वचन उडवून लावणाऱ्या मला त्यांनी माझी इच्छा विचारली-- 'मित्रा! जर तू कामभोगांचा उपभोग घेणार नाहीस तर तू कशाची इच्छा करतोस?' ॥ ५ ॥

तेसाहं एवं अवचं अत्थकामो हितेसिनं
नाहं पत्थेमि गिहीभावं नेक्खम्माभिरतो अहं ॥ ६ ॥

माझ्या कल्याणाची इच्छा असलेला मी त्या हितचिंतकांना म्हणालो-- 'मला गृहस्थ जीवनाची इच्छा नाही, मी (गृह त्यागात) नैष्क्रम्यात रत आहे. ॥ ६ ॥

ते मय्हं वचनं सुत्वा पितु मातु च सावयुं
माता पिता एवमाहु-सब्बेपि पब्बज्ञाम भो ॥ ७ ॥

त्यांनी माझे वचन ऐकून (माझ्या) आई-वडिलांना सांगितले तेव्हा आई-वडील असे म्हणाले, ‘आपण सर्वच प्रव्रज्या घेऊ’. ॥ ७ ॥

उभो माता पिता मय्हं भगिनी च सत्त भातरो
अमितधनं छडड्यित्वा पाविसिम्हा महावनं ति ॥ ८ ॥

अपरिमित धनाचा त्याग करून माझे दोघे आई-वडील, बहीण आणि सातही भाऊ आंम्ही (सर्वानी) वनात प्रवेश केला. ॥ ८ ॥

□□

## ५. सोणपण्डित-चरियं (५. सोणपंडीत चर्या)

पुनापरं यदा होमि नगरे ब्रह्मवड्ढने
तत्थ कुलवरे सेट्ठे महासाले अजायहं ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी ब्रह्मवर्धन नगरात महान श्रीमंत व्यापाऱ्याच्या श्रेष्ठ कुटुंबात जन्माला आलो, ॥ १ ॥

तदापि लोकं दिस्वान अन्धभूतं तमोत्थतं
चित्तं भवतो पटिकुटति तुत्तवेगहतं विय ॥ २ ॥

तेव्हा सुद्धा अंध झालेल्या व अंधाराने झाकलेल्या लोकांना पाहून, पराणीने टोचलेल्या (वाहक प्राण्याप्रमाणे) माझे चित्त संसारापासून जोराने माघार घेत होते. ॥ २ ॥

दिस्वान विविधं पापं एवं चिन्तेसहं तदा
कदाहं गेहा निक्खम्म पविसिस्सामि काननं ॥ ३ ॥

त्यावेळी मी नानाप्रकारचे पाप पाहून असा विचार केला 'मी घरातून बाहेर पडून केव्हा अरण्यात प्रवेश करीन?'- ॥ ३ ॥

तदापि मं निमन्तिंसु कामभोगेहि ञातयो
तेसम्पि छन्दमाचिक्खिं मा निमन्तेथ तेहि मं ॥ ४ ॥

तेव्हा सुद्धा नातलगांनी कामभोगांचा उपभोग घेण्यास सांगितले, त्यांनासुद्धा मी आपली आवड सांगितली व म्हटले, 'त्या (कामभोगांचा लोभ दाखवून) मला संसारात बोलवू नका. ॥ ४ ॥

यो मे कनिट्ठको भाता नन्दो नामासि पण्डितो
सोपि मं अनुसिक्खन्तो पब्बज्जं समरोचयि ॥ ५ ॥

जो माझा नंद नावाचा लहान, हुषार भाऊ होता. त्याने सुद्धा माझे अनुकरण करून प्रव्रज्या पसंत केली. ॥ ५ ॥

अहं सोणो च नन्दो च उभो मातापिता मम
तदापि भोगे छड्डेत्वा पाविसिम्ह महावनं ति ॥ ६ ॥

मी सोण (माझा भाऊ) नंद आणि माझे दोघेही आई-वडील आम्ही त्यावेळीसुद्धा (काम) भोगांचा त्याग करून मोठ्या अरण्यात प्रवेश केला. ॥ ६ ॥

□□

# चतुत्थो परिच्छेदो/चौथा परिच्छेद

## अधिट्ठान पारमिता/अधिष्ठान पारमिता

### १. तेमिय-चरियं (१. तेमिय चर्या)

पुनापरं यदा होमि कासिराजस्स अत्रजो
मूगपक्खो ति नामेन तेमियो ति वदन्ति मं ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी काशीच्या राजाचा पुत्र झालो तेव्हा मला मुका-पांगळा तेमिय ह्या नावाने हाक मारीत असत. ॥ १ ॥

सोळसित्थिसहस्सानं न विज्जति पुमो तदा
अहोरत्तानं अच्चयेन निब्बत्तो अहमेकको ॥ २ ॥

त्यावेळी (काशी नरेशाच्या) सोळा हजार पत्नींना (एकही) पुत्र नव्हता, दीर्घकाळानंतर मी एकटा जन्माला आलो. ॥ २ ॥

किच्छा लद्धं पियं पुत्तं अभिजातं जुतिन्धरं
सेतच्छन्तं धारयित्वान सयने पोसेति मं पिता ॥ ३ ॥

(माझे) पिता (मोठ्या) कष्टाने प्राप्त झालेल्या कुलवान व प्रकाशमान अशा आपल्या प्रिय पुत्राचे श्वेत छत्र ज्याच्यावर उभारले आहे अशा शय्येवर ठेवून पालन-पोषण करीत होते. ॥ ३ ॥

निद्दायमानो सयनवरे पबुज्झित्वानऽहं तदा
अद्दसं पण्डरं छत्तं येनाहं निरयं गतो ॥ ४ ॥

ज्यामुळे मी (पूर्वजन्मात) नरकात पडलो होतो ते श्वेत छत्र माझ्या उत्कृष्ठ शय्येवर उभारलेले मी झोपेतून उठल्यावर पाहिले. ॥ ४ ॥

सह दिट्ठस्स मे छत्तं तासो उप्पज्जि भेरवो
विनिच्छयं समापन्नो कथाहं इमं मुञ्चिस्सं ॥ ५ ॥

ते श्वेत छत्र पाहिल्याबरोबर मला खूप भीती वाटली. मी विचार करू लागलो 'मी यापासून कसा मुक्त होईन.' ॥ ५ ॥

पुब्बसालोहिता मय्हं देवता अत्थकामिनी
सा मं दिस्वान दुक्खितं तीसु ठानेसु योजयि ॥ ६ ॥

पूर्वजन्मी माझ्याशी एक रक्ताचे नाते बाळगणाऱ्या एका हितचिंतक देवतेने मला दुःखित झालेला पाहून तीन गोष्टी करण्यास सांगितले-- ॥ ६ ॥

मा पण्डिच्चं विभावय बालमतो भव सब्बपाणिनं
सब्बो जनो ओचिनायतु एवं तव अत्थो भविस्सति ॥ ७ ॥

'पांण्डित्य प्रगट करू नकोस, सर्व लोक तुला मुर्ख समजोत व सर्व जनता (अपशकुनी म्हणून) तुझा तिरस्कार करोत, अशा प्रकारे तुझे इच्छित साध्य होईल. ॥ ७ ॥

एवं वुत्तायऽहं तस्सा इदं वचनमब्रवि-
करोमि तेऽतं वचनं यं त्वं भणसि देवते ॥ ८ ॥

तिने असे म्हटल्यावर मी तिला असे म्हटले, 'हे देवी! तू जे म्हणत आहेस त्या वचनाप्रमाणे मी करीन.' ॥ ८ ॥

अत्थकामासि मे अम्म हितकामाऽसि देवते
तस्साहं वचनं सुत्वा सागरे व थलं लभि ॥ ९ ॥

हे देवी, माते! तू माझे कल्याण इच्छिणारी व हितचिंमक आहेस. मी तिचे वचन ऐकल्यावर सागरात (बुडणाऱ्या) मला ठाव मिळाल्यासारखे झाले. ॥ ९ ॥

हट्टो संविग्गमानसो तयो अङ्गे अधिट्ठहिं
मूगो अहोसिं बधिरो पक्खो गतिविवज्जितो ॥ १० ॥

हर्षित व आनंदित मनाने मी तीन गोष्टींचे अधिष्ठान केले, मी मुका, बहिरा आणि गतिरहित पंगु झालो. ॥ १० ॥

एते अङ्गे अधिट्ठाय वस्सानि सोळसं वसिं
ततो मे हत्थपादे च जिव्हं सोतंच मद्दिय
अनूनतं मे पस्सित्वा कालकण्णी ति निन्दिसुं ॥ ११ ॥

या गोष्टींचे अधिष्ठान करून मी सोळा वर्ष राहिलो. त्यानंतर माझे हातपाय, जीभ आणि कानाला चेपून व मला अव्यंग पाहून 'अपशकुनी आहे' असे म्हणून निंदा करू लागले. ॥ ११ ॥

ततो जनपदा सब्बे सेनापति-पुरोहिता
सब्बे एकमना हुत्वा छडड्नं अनुमोदिसुं ॥ १२ ॥

त्यानंतर जनपदातील (राज्यातील) सर्व लोक, सेनापती आणि पुरोहित, सर्व एकमताचे होऊन त्यांनी मला सोडून देण्याकरिता अनुमोदन दिले. ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

सोऽहं तेसं मतिं सुत्वा हट्ठो संविग्गमानसो
यस्सत्थाय तपो चिण्णो सो मे अत्थो समिज्झथ ॥ १३ ॥

मी त्यांचे विचार ऐकून हर्षित व आनंदित मनाने (म्हटले)– 'ज्याकरिता मी तप केले ते इच्छित पूर्ण झाले.' ॥ १३ ॥

नहापेत्वा अनुलिम्पित्वा वेठेत्वा राजवेठनं
छत्तेन अभिसिञ्चित्वा कारेसुं पुरपदक्खिणं ॥ १४ ॥

(मला) स्नान घालून (सुगंधी) लेप लावून, राजवस्त्र नेसवून, (राज-) अभिषेक करवून-छत्र उभारून नगराची प्रदक्षिणा करविली. ॥ १४ ॥

सत्ताहं धारयित्वान उग्गते रविमण्डले
रथेन मं नीहरित्वा सारथी वनमुपागमि ॥ १५ ॥

एक आठवडाभर (राजछत्र) धारण करवून (आठव्या दिवशी) सूर्योदय झाल्यावर मला रथात घेऊन सारथी अरण्यात आला.– ॥ १५ ॥

एकोकासे रथं कत्वा सज्जस्सं हत्थमुच्चितो
सारथी खणति कासुं निखातुं पठविया ममं ॥ १६ ॥

घोड्यांनी सज्ज असलेला रथ एका बाजूला करून, हात मोकळा झाल्यावर मला जमिनीमध्ये गाडण्यासाठी सारथी खड्डा खणू लागला. ॥ १६ ॥

अधिट्ठितमधिट्ठानं तज्जेन्तो विविधकारणा
न भिन्दिं वतमधिट्ठानं बोधिया येव कारणा ॥ १७ ॥

मी अनेक प्रकारे हालअपेष्टांनी पीडित होऊन सुद्धा बोधिच्या कारणासाठीच स्वीकारलेल्या निश्चय-व्रताचा भंग होऊ दिला नाही. ॥ १७ ॥

माता पिता न मे देस्सा अत्ता मे न च देस्सियो
सब्बञ्ञुतं पियं मय्हं तस्मा वतमधिट्ठहिं ॥ १८ ॥

मला आई-वडिलांचा द्वेष नव्हता अथवा मी स्वतःचा द्वेष करीत नव्हतो; (परंतु) मला सर्वज्ञता प्रिय होती त्यामुळे मी व्रतांचे अधिष्ठान केले. ॥ १८ ॥

एते अङ्गे अधिट्ठाय वस्सानि सोळसं वसिं
अधिट्ठानेन मे समो नत्थि एसा मे अधिट्ठानपारमी ति ॥ १९ ॥

अनुक्रमणिका

या गोष्टींचे अधिष्ठान करून मी सोळा वर्ष राहिलो. अधिष्ठाना (निश्चया) मध्ये माझ्यासारखा (दुसरा) कोणी नाही, ही माझी अधिष्ठान पारमिता होती. ॥ १९ ॥

□□

अनुक्रमणिका

## पञ्चमो परिच्छेदो/पाचवा परिच्छेद

## सच्चपारमिता/सत्यपारमिता

### १. कपिराज-चरियं (१. कपिराज चर्या)

यदा अहं कपि आसिं नदीकूले दरीसये
पीळितो सुंसुमारेन गमनं न लभामहं ॥ १ ॥

जेव्हा मी नदीच्या किनाऱ्यावर व दरीमध्ये राहणारा माकड होतो, तेव्हा (एका) मगरामुळे त्रस्त असल्यामुळे (कोठे) जाऊ शकत नव्हतो. ॥ १ ॥

यम्होकासे अहं ठत्वा ओरा पारं पतामहं
तत्थच्छि सत्तु वधको कुम्भीलो लुद्ददस्सनो ॥ २ ॥

मी ज्या ठिकाणी उभा राहून अलिकडून पलीकडे उडी मारत असे, तेथे (एक) भयानक (मला) ठार करणारा शत्रू असलेला मगर राहात होता. ॥ २ ॥

सो मं असंसि एही ति अहमेमी ति तं वदिं
तस्स मत्थकमक्कम्म परकुले पतिट्ठहिं ॥ ३ ॥

त्याने मला 'ये' असे म्हटले, 'मी येत आहे' असे त्याला म्हटले व त्याच्या डोक्यावर उडी मारून दुसऱ्या किनाऱ्यावर उभा राहिलो. ॥ ३ ॥

न तस्स अलिकं भणितं यथा वाचं अकासहं
सच्चेन मे समो नत्थि एसा मे सच्चपारमी ति ॥ ४ ॥

मी त्याच्याशी खोटे बोललो नाही, मी जसे बोललो तसेच केले. सत्यामध्ये माझ्यासारखा (दुसरा) कोणी नाही ही माझी सत्यपारमिता होती. ॥ ४ ॥

□□

## २. सच्चसव्हयपण्डित-चरियं (२. सत्यसव्हयपंडित चर्या)

पुनापरं यदो होमि तापसो सच्चसव्हयो
सच्चेन लोकं पालेसिं, समग्गं जनमकासहं’ति ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी ‘सत्य’ नावाचा तपस्वी होतो तेव्हा मी सत्याने लोकांचे पालन केले व जनतेला एकत्र ठेवले (त्यांच्यात एकजूट ठेवली) ॥ १ ॥

□□

# ३. वट्टपोतक-चरियं (३. वट्टपोतक चर्या)

पुनापरं यदा होमि मगधे वट्टपोतको
अजातपक्खो तरुणो मंसपेसि कुलावके ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी मगध (देशात) पंख न फुटलेला तरुण, मांसाचा गोळा असा घरट्यामध्ये लावा पक्षाचे पिल्लू होतो, ॥ १ ॥

मुखतुण्डकेनाहरित्वा माता पोसति ममं
तस्सा फस्सेन जीवामि नत्थि मे कायिकं बलं ॥ २ ॥

तेव्हा चोचीने (दाणे) आणून माझी आई माझे पोषण करीत होती. मी तिच्या स्पर्शाने जगत होतो, माझ्यामध्ये शारीरिक बळ नव्हते. ॥ २ ॥

संवच्छरे गिम्हसमये दवदाहो पदिप्पति
उपगच्छति अम्हाकं पावको कण्हवत्तनी ॥ ३ ॥

दरवर्षी उन्हाळ्यात अरण्यामध्ये वणवा पेटत असे व आपल्या मार्गातील सर्वांची काळीराख करणारा अग्नी आमच्याकडे येत असे. ॥ ३ ॥

धमधमा इति एवं सद्दायन्तो महा सिखी
अनुपुब्बेन झापेंन्तो अग्गि ममुपागमि ॥ ४ ॥

'धमधम' असा मोठा आवाज करीत शिखारूपी ज्वाला धारण करणारा अग्नी (वाटेतील सर्व वस्तू) क्रमाक्रमाने जाळत जाळत माझ्यापर्यंत आला. ॥ ४ ॥

अग्गिवेगभया भीता तसिता माता पिता मम
कुलावके मं छड्डेत्वा अत्तानं परिमोचयुं ॥ ५ ॥

अग्नीवेगाच्या भयाने भ्यालेले व त्रस्त झालेले माझे आई-वडील मला घरट्यात सोडून (उडून गेले) व (त्यांनी) स्वतःची सुटका केली. ॥ ५ ॥

पादे पक्खे पजहामि नत्थि मे कायिकं बलं
सोहं अगतिको तत्थ एवं चिन्तेसहं तदा ॥ ६ ॥

मी पाय व पंख फडफडविले परंतु मला शारीरिक बळ नव्हते. त्यामुळे मी तेथे अगतिक होऊन असा विचार केला-- ॥ ६ ॥

येसाहं उपधावेय्यं भीतो तसितवेधितो
ते मं ओहाय पक्कन्ता कथं मे अज्ज कातवे ॥ ७ ॥

‘भयभीत, त्रस्त व थरकाप झालेला मी ज्यांच्याकडे धावावे ते मला सोडून निघून गेले, मी आज काय करावे? ॥ ७ ॥

अत्थि लोके सीलगुणो सच्चं सोचेय्यनुद्दया
तेन सच्चेन काहामि, सच्चकिरियमुत्तमं ॥ ८ ॥

जगात शीलगुण, सत्य, पावित्र्य व करुणा आहे या सत्याने उत्तम सत्यक्रिया [टीप पहा] करीन.’ ॥ ८ ॥

आवज्जेत्वा धम्मबलं सरित्वा पुब्बके जिने
सच्चबलमवस्साय सच्चकिरियमकासहं ॥ ९ ॥

धम्म-सामर्थ्याचा विचार करून व पूर्वकाळातील बुद्धांचे स्मरण करून सत्य बळाच्या सहायाने मी सत्य क्रिया केली— ॥ ९ ॥

सन्ति पक्खा अपतना सन्ति पादा अवञ्चना
मातापिता च निक्खन्ता जात-वेद पटिक्कम ॥ १० ॥

‘माझे पंख आहेत, पण ते उडण्यायोग्य नाहीत, माझे पाय आहेत, पण ते चालू शकत नाहीत; आई-वडील निघून गेले आहेत. हे अग्नी परत जा.’ ॥ १० ॥

सह सच्चे कते मय्हं महापज्जलिकतो सिखी
वज्जेसि सोलसकरीसानि उदकं पत्वा यथा सिखी
सच्चेन मे समो नत्थि एसा मे सच्चपारमी ति ॥ ११ ॥

मी सत्यक्रिया केल्याबरोबर, महाप्रज्वलित झालेला अग्नी पाण्यापाशी पोहोचल्यावर (नष्ट) होणाऱ्या अग्नीप्रमाणे, सोळा करीष (भूमी) मागे जाऊन (नाहिसा झाला). सत्यामध्ये माझ्यासारखा (दुसरा कोणी) नाही. ही माझी सत्यपारमिता होती. ॥ ११ ॥

□□

# ४. मच्छराज-चरियं (४. मच्छराज चर्या)

पुनापरं यदा होमि मच्छराजा महासरे
उण्हे सुरियसन्तापे सरे उदकं खीयथ ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी अतिशय मोठ्या तळ्यात मासा झालो तेव्हा उन्हाळ्यात सूर्याच्या उष्णतेने तळ्यातील पाणी आटले. ॥ १ ॥

ततो काका च गिज्झा च बका कुललसेनका
भक्खयन्ति दिवा रत्तिं मच्छे उपनिसीदिय ॥ २ ॥

तेव्हा कावळे, गिधाडे, बगळे आणि बहिरी ससाणे हे रात्रंदिवस माशांजवळ बसून त्यांना खात असत. ॥ २ ॥

एवं चिन्तेसहं तत्थ सह ञातीहि पीळितो
केन नु खो उपायेन ञाती दुक्खा पमोचये ॥ ३ ॥

जाती बांधवासह पीडित झालेला मी तेथे विचार केला, ‘कोणत्या उपायाने जातीबांधवांना दुःखापासून मुक्त करावे?’ ॥ ३ ॥

विचिन्तयित्वा धम्मत्थं सच्चं अद्दस पस्सयं
सच्चे ठत्वा पमोचेसिं ञातीनं तं अतिक्खयं ॥ ४ ॥

धर्मार्थाचा विचार करून मला सत्यात आसरा आढळून आला. सत्त्यावर उभे राहून मी त्यासर्व विनाशापासून जातीबांधवांना मुक्त केले. ॥ ४ ॥

अनुस्सरित्वा सद्धम्मं परमत्थं विचिन्तयं
अकासिं सच्चकिरियं यं लोके धुवसस्सतं ॥ ५ ॥

सद्धम्माचे स्मरण करून, परमार्थाचा विचार करून, जी जगात ध्रुव व शाश्वत आहे अशी सत्यक्रिया केली. ॥ ५ ॥

यतो सरामि अत्तानं यतो पत्तोस्मि विञ्ञुतं
नाभिजानामि सञ्चिच्च एकपाणं विहिंसितं
एतेन सच्चवज्जेन पज्जुन्नो अभिवस्सतु ॥ ६ ॥

जेव्हापासून मला आठवते आहे व जेव्हापासून शहाणा झालो आहे तेव्हापासून मी एकासुद्धा प्राण्याची जाणून बुजून हिंसा केली असे जाणत नाही. ह्या सत्याने मेघांचा वर्षाव होवो!-॥ ६ ॥

अनुक्रमणिका

अभित्थनय पज्जुन्न निधिं काकस्स नासय
काकं सोकाय रून्धेहि मच्छे सोका पमोचय ॥ ७ ॥

हे मेघांनो! गर्जना करीत वर्षाव करा. कावळ्यांच्या समुहाचा नाश करा. कावळ्यांना शोक प्राप्त होईल अशारीतीने त्याना रोखा व मासळ्यांना शोकापासून मुक्त करा. ॥ ७ ॥

सहकते सच्चवरे पज्जुन्नो अभिगज्जिय
थलं निन्नच पूरेन्तो खणेन अभिवस्सथ ॥ ८ ॥

उत्तम सत्यक्रिया केल्याबरोबर मेघांनी गर्जना करून ऊंच व सखल भाग भरून टाकणाऱ्या पावसाचा क्षणात वर्षाव केला. ॥ ८ ॥

एवरूपं सच्चवरं कत्वा विरियमुत्तमं
वस्सापेसिं महामेघं सच्चतेजबलस्सितो
सच्चेन मे समो नत्थि एसा मे सच्चपारमी ति ॥ ९ ॥

अशा प्रकारे उत्तम सत्यक्रिया व उत्तम उद्योग करून सत्याच्या तेजबळाच्या सहायाने मी महामेघाना वर्षाव करावयास लावला. सत्यामध्ये माझ्यासारखा दुसरा कोणी नाही. ही माझी सत्यपारमिता होती. ॥ ९ ॥

□□

## ५. कण्हदीपायन–चरियं (५. कृष्णद्वैपायनचर्या)

पुनापरं यदा होमि कण्हदीपायनो इसि
परोपञ्ञासवस्सानि अनभिरतो चरिं अहं ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी कृष्ण-द्वैपायन ऋषी झालो तेव्हा मी पन्नासपेक्षा अधिक वर्ष अनासक्त होऊन विचरण केले. ॥ १ ॥

न कोचि एतं जानाति अनभिरतिमनं मम
अहम्पि कस्सचि नाचिक्खिं अरति मे चरति मानसे ॥ २ ॥

माझे अनासक्त मन कोणीही जाणत नव्हते. माझ्या मनात अनासक्ती आहे हे मी सुद्धा कोणाला सांगितले नाही. ॥ २ ॥

सब्रह्मचारी मण्डव्यो सहायो मे महा इसि
पुव्वकम्मसमायुत्तो सूलमारोपनं लभि ॥ ३ ॥

माझा सह-ब्रह्मचारी व मित्र माण्डव्य नावाचा महर्षि होता. त्याला पूर्वकर्मामुळे, सुळावर चढविण्याची (फाशीची) शिक्षा झाली. ॥ ३ ॥

तमहं उपट्ठहित्वान आरोग्यमनुपापयिं
आपुच्छित्वान आगच्छिं यं मय्हं सकमस्समं ॥ ४ ॥

मी त्याची सेवा करून त्याला निरोगी केले व त्याची परवानगी घेऊन स्वतःच्या आश्रमाकडे आलो. ॥ ४ ॥

सहायो ब्राह्मणो मय्हं भरियमादाय पुत्तकं
तयो जना समागन्त्वा आगच्छुं पाहुनागतं ॥ ५ ॥

माझा एक ब्राह्मण मित्र आपल्या पत्नीला व पुत्राला घेऊन-असे तिघेजण मिळून पाहुणे म्हणून आले. ॥ ५ ॥

सम्मोदमानो तेहि सह निसिन्नो सकमस्समे
दारको वट्टमनुक्खिपं आसीविसमकोपयि ॥ ६ ॥

मी त्यांच्या बरोबर त्यांची आनंदाने विचारपूस करीत स्वतःच्या आश्रमात बसलो होतो. (तेव्हा) त्यांच्या मुलाने चेंडू फेकून एका दाढेत वीष बाळगणाऱ्या (सापाला) क्रोधित केले. ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

ततो सो वट्टगतं मग्गं अन्वेसन्तो कुमारको
आसीविसस्स हत्थेन उत्तमङ्गं परामसि ॥ ७ ॥

तेव्हा तो मुलगा चेंडू गेलेल्या मार्गाने शोध घेत असता त्याने त्या विषारी सापाच्या डोक्याला हाताने स्पर्श केला. ॥ ७ ॥

तस्स आमसने कुद्धो सप्पो विसबलस्सितो
कुपितो परमकोपेन अडंसि दारकं खणे ॥ ८ ॥

त्याच्या स्पर्शाने आपल्या विषाच्या बलावर भिस्त ठेवणारा साप क्रोधित झाला आणि त्याच क्षणी अत्यंत कोधाने तो मुलाला चावला. ॥ ८ ॥

सह दट्ठो अतिविसेन दारको पपति भूमियं
तेनाहं दुक्खितो आसिं मम वाहसि तं दुक्खं ॥ ९ ॥

अति विषारी साप चावल्याबरोबर मुलगा जमिनीवर पडला. त्यामुळे मी दुःखित झालो. हे दुःख माझ्याही ठिकाणी येऊन पोहोचलो. ॥ ९ ॥

त्याहं अस्सासयित्वान दुक्खिते सोकसल्लिते
पठमं अकासिं किरियं अग्गं सच्चं वरुत्तमं ॥ १० ॥

त्या दुःखित शोकाने पीडित झालेल्या (आई-वडिलांना) आश्वासन देऊन मी प्रथम श्रेष्ठ व उत्तम सत्यक्रिया [टीप पहा] केली– ॥ १० ॥

सत्ताहमेवाहं पसन्नचित्तो
पुञ्ञत्थिको अचरिं ब्रह्मचरियं
अथापरं यं चरितं ममयिदं
वस्सानि पञ्ञास समाधिकानि ॥ ११ ॥

अकामको वा हि अहं चरामि
एतेन सच्चेन सुवत्थि होतु
हतं विसं जीवतु यञ्ञदत्तो ॥ १२ ॥

'मी पुण्याच्या इच्छेने प्रसन्नचित्त होऊन एक आठवडा पर्यंतच ब्रह्मचर्याचे पालन केले व त्यानंतर पन्नास पेक्षा जास्त वर्षे मी विचरण केले, ते मी अनासक्त होऊनच विचरण केले. या सत्याने कल्याण होवो, विष नष्ट होवो व यज्ञदत्त जिवंत होवो' ॥ ११-१२ ॥

अनुक्रमणिका

सह सच्चे कते मय्हं विसवेगेन वेधितो
अबुज्झित्वान वुट्ठासि आरोगो चासि माणवो
सच्चेन मे समो नत्थि एसा मे सच्चपारमी’ति ॥ १३ ॥

मी सत्य क्रिया केल्याबरोबर विषाने व्याधित झालेला मुलगा केवळ बेशुद्धावस्थेत न राहता निरोगी होऊनच उठून बसला. सत्यामध्ये माझ्यासारखा (दुसरा कोणी) नाही. ही माझी सत्य-पारमिता होती. ॥ १३ ॥

□□

## ६. सुतसोमचरियं (६. सुतसोमचर्या)

पुनापरं यदा होमि सुतसोमो महीपति
गहितो पोरिसादेन ब्राह्मणे सङ्गरं सरिं ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी सुतसोम नावाचा राजा झालो तेव्हा नरभक्षक यक्षाने पकडल्यावर ब्राह्मणाला दिलेल्या वचनाची आठवण झाली. ॥ १ ॥

खत्तियानं एकसतं आवुनित्वा करतले
एते सम्पमिलापेत्वा यञ्‍ञत्थे उपनयिं ममं ॥ २ ॥

शंभर क्षत्रियांच्या हातांना छिद्रे पाडून त्यातून दोरी ओवून त्यांना भिरभिर फिरवण्यासारख्या हाल अपेष्टा करून त्यांची शरीरे सुकवून बळी देण्याकरिता (इतरांच्या बरोबर) मलाही नेले. ॥ २ ॥

अपुच्छि मं पोरिसादो किं त्वं इच्छसि निस्सजं
यथामति ते काहामि यदि मे त्वं पुनेहिसि ॥ ३ ॥

नरभक्षक यक्षाने मला विचारले, 'तुझी सुटण्याची इच्छा आहे काय? जर तू पुन्हा येशील तर मी तुझ्या इच्छेप्रमाणे करीन.' ॥ ३ ॥

तस्स पटिस्सुणित्वान पण्हे आगमनं मम
उपगन्त्वा पुरं रम्मं रज्जं निय्यादियिं तदा ॥ ४ ॥

'मी सकाळी पुनः येईन' असे त्याला प्रत्युत्तर देऊन रम्य नगरात पुनः येऊन (माता पितरांवर) राज्य सोपविले. ॥ ४ ॥

अनुस्सरित्वा सतं धम्मं पुब्बकं जिनसेवितं
ब्राह्मणस्स धनं दत्वा पोरिसादं उपागमिं ॥ ५ ॥

पूर्वीच्या बुद्धांनी आचरलेल्या सद्धम्माचे स्मरण करून, ब्राह्मणाला धन देऊन मी नरभक्षक यक्षाकडे आलो. ॥ ५ ॥

नत्थि मे संसयं तत्थ घातयिस्सति वा न वा
सच्चवाचानुरक्खन्तो जीवितं चजितुमुपागमिं
सच्चेन मे समो नत्थि एसा मे सच्चपारमी ति ॥ ६ ॥

तो मला तेथे मारेल अथवा नाही याबद्दल संशय नव्हता, परंतु सत्यवचनाचे पालन करणारा मी जीवितांचा त्याग करण्याकरिता (त्याचेकडे) गेलो. सत्यामध्ये माझ्यासारखा दुसरा कोणी नाही. ही माझी सत्यपारमिता होती. ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

## छट्ठो परिच्छेदो/सहावा परिच्छेद

## मेत्तापारमिता/मैत्रीपारमिता

### १. सुवण्णसाम-चरियं (१. सुवण्णासाम-चर्या)

सामो यदा वने आसिं सक्केन अभिनिम्मितो
पवने सीहव्यग्धे च मेत्तायमुपनामयिं ॥ १ ॥

जेव्हा मी इंद्राने उत्पन्न केलेल्या वनामध्ये साम नावाचा (कुमार) झालो तेव्हा अरण्यामधील वाघ, सिंह यांना आपल्याजवळ आणले. ॥ १ ॥

सीहव्यग्धेहि दीपीहि अच्छेहि महिसेहि च
पसदमिगवराहेहि परिवारेत्वा वने वसिं ॥ २ ॥

मी सिंह, वाघ, चित्ते, अस्वले, रेडे, ठिपके असलेली हरिणे आणि रानडुकरे यांनी वेढून अरण्यात राहत असे. ॥ २ ॥

न मं कोचि उत्तस्सति न पि भायामि कस्सचि
मेत्ताबलेनुपत्थद्धो रमामि पवने तदा ॥ ३ ॥

मला कोणी त्रास देत नव्हता अथवा मी सुद्धा कोणाला भीत नसे. मैत्री बळाने पक्का उभारला गेलेला मी तेव्हा अरण्यात राहात असे. ॥ ३ ॥

□□

अनुक्रमणिका

## २. एकराज-चरियं (२. एकराज-चर्या)

पुनापरं यदा होमि एकराजा ति विस्सुतो
परमं सीलमधिट्ठाय पसासामि महामहिं ॥ १ ॥

पुनः नंतर जेव्हा मी एकराज नावाने प्रसिद्ध झालो तेव्हा उत्तम शीलावर अधिष्ठान करून महापृथ्वीवर राज्य करीत होतो. ॥ १ ॥

दसकुसलकम्मपथे वत्तामि अनवसेसतो
चतूहि सङ्गहवत्थूहि सङ्गण्हामि महाजनं ॥ २ ॥

संपूर्णपणे दहा कुशल कर्मपथावर वाटचाल करीत होतो आणि चार संग्रह वस्तूंनी मोठ्या जनसमुहाला एकत्र ठेवत होतो. ॥ २ ॥

एवं मे अप्पमत्तस्स इध लोके परत्थ च
दब्बसेनो उपागन्त्वा अच्छिन्दन्तो पुरं ममं ॥ ३ ॥

राजूपजीवे निगमे सबलट्ठे सरट्ठके
सब्बं हत्थगतं कत्वा कासुया निक्खणी ममं ॥ ४ ॥

अशा प्रकारे या जगात व परलोकात अप्रमत्त होऊन राज्य करीत असता दब्बसेन येऊन माझ्या नगराला बळकावीत राजावर अवलंबून असणाऱ्या सर्व लोकांना, शहरवासि सैनिकाना, संपूर्ण राष्ट्राला आपल्या ताब्यात घेऊन त्याने मला खड्ड्यात गाडले. ॥ ३-४ ॥

अमच्चमण्डलं रज्जं फीतं अन्तेपुरं मम
अच्छिन्दित्वान गहितं पियं पुत्तं व पस्सहं
मेत्ताय मे समो नत्थि एसा मे मेत्तापारमी’ ति ॥ ५ ॥

मंत्री-मंडळ समृद्ध राज्य आणि माझे अंतःपुर बळजबरीने घेऊनसुद्धा (मी त्या दब्बसेनाला) प्रिय पुत्राप्रमाणे पाहिलें. मैत्रीमध्ये माझ्यासारखा (दुसरा कोणी) नव्हता. ही माझी मैत्री-पारमिता होती. ॥ ५ ॥

□□

अनुक्रमणिका

# सत्तमो परिच्छेदो/सातवा परिच्छेद

## उपेक्खा पारमिता/उपेक्षा पारमिता

### १. महालोमहंस-चरियं (महालोमहंस चर्या)

सुसाने सेय्यं कप्पेमि छवट्ठिकं उपनिधायऽहं
गोमण्डला उपगन्त्वा रूपं दस्सेन्तिऽनप्पकं ॥ १ ॥

मी स्मशानात प्रेतांच्या हाडांवर डोके ठेवून झोपत होतो. गावातील मुले माझ्याकडे येऊन निरनिराळ्या प्रकाराने वाकुल्या दाखवीत होती. ॥ १ ॥

अपरे गन्धञ्च मालञ्च भोजनं विविधं बहुं
उपायनानूपनेन्ति हट्ठा संविग्गमानसा ॥ २ ॥

दुसरे लोक गंध, माळा, नाना प्रकारचे व मुबलक भोजन आणि उपहार घेऊन हर्षयुक्त व आनंदाने प्रफुल्लित झालेल्या मनाने माझ्याकडे येत होते. ॥ २ ॥

ये मे दुक्खं उपदहन्ति ये च देन्ति सुखं मम
सब्बेसं समको होमि दया कोपो न विज्जति ॥ ३ ॥

जे मला दुःख देत होते व जे मला सुख देत होते, त्या सर्वांबद्दल मी समवृत्ती होतो. माझ्यामध्ये दया अथवा कोप नव्हता. ॥ ३ ॥

सुखदुक्खे तुलाभूतो यसेसु अयसेसु च
सब्बत्थ समको होमि एसा मे उपेक्खापारमी ति ॥ ४ ॥

सुख-दुःखात आणि यश व अपयशामध्ये या सर्वांमध्ये माझ्या ठिकाणी तराजूप्रमाणे समभाव होता. ही माझी उपेक्षा-पारमिता होती. ॥ ४ ॥

॥ उपेक्खा पारमिता निट्ठिता ॥

॥ उपेक्षा पारमिता समाप्त ॥

#### उद्दानं (उद्दानं)

युधञ्जयो, सोमनस्सो अयोघरभिसेन च
सोणनन्दो मूगपक्खो कपिराजा सच्चसव्हयो ॥ १ ॥

अनुक्रमणिका

युधंजय, सोमनस्स, अयोधर आणि भीस, सोणनंद, मूगपक्ख कपिराजा आणि सत्यसव्हय, ॥ १ ॥

वट्टको मच्छराजा च कण्हदीपायनो इसि
सुतसोमो पुन आसिं सामो च एकराज'हु
उपेक्खा पारमी आसि इति वुतं महेसिना ॥ २ ॥

वट्टक, मत्स्यराज, कृष्णद्वैपायन ऋषी, सुतसोम, पुनः मी साम आणि एकराज होतो. (नंतर) उपेक्षा पारमिता होती असे महर्षीने म्हटले आहे. ॥ २ ॥

एवं बहुविधं दुक्खं सम्पत्ति च बहुविधा
भवाभवे अनुभवित्वा पत्तो सम्बोधिमुत्तमं ॥ ३ ॥

अशा प्रकारे पुष्कळ प्रकारचे दुःख आणि पुष्कळ प्रकारच्या संपत्तीचा जन्मजन्मांतरामध्ये अनुभव घेऊन मी उत्तम सम्बोधि प्राप्त केली. ॥ ३ ॥

दत्वा दातब्बकं दानं सीलं पूरेत्वा असेसतो
नेक्खम्मे पारमिं गन्त्वा, पत्तो सम्बोधिमुत्तमं ॥ ४ ॥

देण्यायोग्य दान देऊन, शीलाचे पूर्णपणे पालन करून, नैष्क्रम्य-पारमितेला जाऊन मी उत्तम सम्बोधि प्राप्त केली. ॥ ४ ॥

पण्डिते परिपुच्छित्वा विरियं कत्वानमुत्तमं,
खन्तिया पारमिं गन्त्वा पत्तो सम्बोधिमुत्तमं ॥ ५ ॥

पंडितांना विचारून, उत्तम उद्योग करून, क्षान्ति-पारमितेला जाऊन मी उत्तम सम्बोधि प्राप्त केली. ॥ ५ ॥

कत्वा दळहं अधिट्ठानं सच्चवाचानुरक्खिया
मेत्ताय पारमिं गन्त्वा, पत्तो सम्बोधिमुत्तमं ॥ ६ ॥

दृढ अधिष्ठान करून, सत्य वचनाचे पालन करून, मैत्री-पारमितेला जाऊन मी उत्तम सम्बोधि प्राप्त केली. ॥ ६ ॥

लाभालाभे यसायसे सम्माननावमानने
सब्बत्थ समानो हुत्वा, पत्तो सम्बोधिमुत्तमं ॥ ७ ॥

लाभ-अलाभ, यश-अपयश, मान-सन्मान सर्वत्र समभाव ठेवून मी उत्तम सम्बोधि प्राप्त केली. ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

कोसज्जं भयतो दिस्वा विरियारम्भं च खेमतो
आरद्धविरिया होथ एसा बुद्धानुसासनी ॥ ८ ॥

आळसात भय पाहून आणि उद्योग कुशल आहे असे पाहून उद्योगी व्हा. हा बुद्धाचा उपदेश आहे. ॥ ८ ॥

विवादं भयतो दिस्वा अविवादञ्च खेमतो
समग्गा सखिला होथ एसा बुद्धानुसासनी ॥ ९ ॥

वादविवादात भय पाहून आणि अविवाद कुशल आहे असे पाहून एक व्हा व गोड-बोले व्हा. हा बुद्धाचा उपदेश आहे. ॥ ९ ॥

पमादं भयतो दिस्वा अप्पमादञ्च खेमतो
भावेथट्ठङ्गिकं मग्गं एसा बुद्धानुसासनी ॥ १० ॥

प्रमादात भय पाहून आणि अप्रमाद कुशल आहे असे पाहून अष्टांगिक मार्गाची भावना करा. (अष्टांगिक मार्गाप्रमाणे आचरण करा) हा बुद्धाचा उपदेश आहे. ॥ १० ॥

इत्थं सुदं भगवा अत्तनो पुब्बचरियं सम्भावयमानो
बुद्धापदानियं नाम धम्मपरियायं अभासित्था’ति ॥ ११ ॥

याप्रमाणे भगवान (बुद्धाने) आपली पूर्व चर्या प्रकाशित करीत ‘बुद्ध-अपदान’ (बुद्ध चरित्र) नामक धम्मपरियाय (उपदेश) सांगितला ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

# टीपा

पारमिता—(पारमि) :— पारमिता म्हणजे पूर्णत्व. बुद्धत्व प्राप्त करण्याकरिता ज्या गोष्टीमध्ये पूर्णत्व मिळविले पाहिजे या गोष्टींना पारमिता म्हटले जाते. पालि मध्ये त्यांना 'पारमि' म्हणतात. या पारमितांचे वर्णन चरियापिटक आणि बुद्धवंस या दोन ग्रंथात करण्यात आले आहे. पारमिता दहा आहेत. त्या खालीलप्रमाणे :—

१. दान
२. शील
३. नैष्क्रम्य
४. प्रज्ञा
५. वीर्य
६. शांती
७. सत्य
८. अधिष्ठान
९. मैत्री
१०. उपेक्षा

**१. दान** :— बोधिसत्व म्हणजे बोधिप्राप्ती करिता प्रयत्नशील प्राणी. ते सर्व प्राणी मात्रांच्या हिताकरिता व सुखाकरिता झटत असतात. ते सर्वाप्रती निपक्षपाती असतात. सर्व प्राणीमात्र सुखी व्हावेत याकरिता ते सर्वांना दान देतात.

**२. शील** :— शील म्हणजे सदाचरण अथवा चारित्र्य. प्राणीमात्रांची हिंसा करणे, चोरी करणे, मिथ्याचार करणे, खोटे बोलणे आणि दारु व इतर मद्यपानापासून अलिप्त राहणे या सर्वांचा शीलामध्ये समावेश होतो.

**३. नैष्क्रम्य** :— शील पूर्ण करण्याकरिता एकान्ताची आवश्यकता असते. संसारामध्ये अनेक अडचणी असतात हे जाणून त्यातून मुक्त होणे व जीवनात उच्चपद प्राप्त करणे त्याला नैष्क्रम्य म्हणतात.

**४. प्रज्ञा** :— प्राणीमात्रांच्या हिताचे काय आणि अहिताचे काय यातील फरक स्पष्टपणे समजण्याकरिता उच्च प्रकारचे ज्ञान प्राप्त करावे लागते त्याला प्रज्ञा म्हणतात.

**५. वीर्य** :— वीर्य म्हणजे चांगले कार्य करण्याचा उत्साह सर्वांच्या हिताकरिता व सुखाकरिता बोधिसत्व आपली संपूर्ण शक्ती खर्च करतात.

**६. शांती** :— बोधिसत्त्वाने विपुल सामर्थ्य आणि शक्ती प्राप्त केली तरी इतर प्राण्यांकडून काही चूका झाल्यास ते त्यांना क्षमा करतात. या गुणाला क्षांती म्हटले जाते.

अनुक्रमणिका

**७. सत्य :–** क्षांतीला सत्याची जोड असली पाहिजे. उन्नती करून घेण्यासाठी सत्याची नितांत आवश्यकता असते. जर त्यांनी एखाद्याला काही द्यायचे वचन दिले अथवा काही करण्याची प्रतिज्ञा केली तर ती ते मोडत नाहीत. त्यांचे सर्व आचरण सत्यावर अधिष्ठित असते.

**८. अधिष्ठान :–** अधिष्ठान म्हणजे दृढनिश्चय. कोणतेही काम हाती घेतले की, ते कितीही संकटे आली तरी पार पाडले पाहिजे. त्यालाच अधिष्ठान म्हणतात.

**९. मैत्री :–** मैत्री म्हणजे सार्वत्रिक प्रेमभाव. मित्र असो अथवा शत्रू असो त्याच्याबद्दल सर्वकाळ, सर्वत्र, संपूर्ण विस्तृत प्रेम बाळगले पाहिजे. पशुपक्षी आदी सर्व प्राणी माझे सोबती आहेत अशी भावना ठेवली पाहिजे.

**१०. उपेक्षा :–** कोणत्याही परिस्थितीत लाभ-अलाभ, निंदा-प्रशंसा, सुख-दुःख अथवा यश-अपयश यापैकी कोणतीही स्थिती प्राप्त झाली असताना मनाचा समतोलपणा ढळू न देणे याला उपेक्षा पारमिता म्हणतात.

**११. दहा कुशल कर्मपथ :–** (दस कुसल कम्मपथ) दहा प्रकारचे कुशल कर्म अथवा कुशल कर्म मार्ग. या कर्मपथानुसार वाटचाल केली असता मानवाची पुनर्जन्मापासून सुटका होते अथवा या कर्मपथानुसार त्याची कृती नसेल तर त्याला वारंवार पुनर्जन्म ग्रहण करावे लागतात. माणसाच्या कृतीवरूनच त्याची गती ठरत असते. कुशल कर्माशिवाय कोणालाही निब्बाण प्राप्ती शक्य नाही. म्हणूनच भगवान बुद्धाने धम्मपदात म्हटले आहे– 'तुम्हेहि किच्चं आतप्पं अक्खातारो तथागता' अर्थात कर्म तुम्हालाच केले पाहिजे तथागत फक्त मार्गदर्शक आहेत.

कर्माचे तीन प्रकारे वर्गिकरण केले जाते.

१. काय कम्म–शरीराने केले जाणारे कर्म
२. वची कम्म–वाणीने केले जाणारे कर्म
३. मनोकर्म–मनाने केले जाणारे कर्म

१. शरीराने केले जाणारे कुशल कर्म तीन प्रकारचे आहे. (अ) प्राणी हिंसा न करणे (ब) चोरी न करणे (क) मिथ्याचार न करणे.

२. वाचेने केले जाणारे कुशल कर्म चार प्रकारचे आहे. (अ) खोटे न बोलने (ब) चहाडी न करणे (क) कठोर शद्ब न उच्चारणे (ड) व्यर्थ बडबड न करणे.

३. मनाने केले जाणारे कुशल कर्म तीन प्रकारचे आहे (अ) लोभ नष्ट करणे (ब) द्वेष नष्ट करणे आणि (क) मिथ्या दृष्टीचा नाश करणे. अशा प्रकारचे दहा कुशल कर्म अथवा कर्मपथ आहेत.

**चार संग्रह वस्तु :–** मानवाने ज्यांचा स्वतःच्या आणि इतरांच्या कल्याणाकरिता संग्रह करावा अशा वस्तू चार आहेत. त्या पुढीलप्रमाणे–

अनुक्रमणिका

(१) दान, (२) प्रिय वचन, (३) उपकार आणि (४) समानतेचा व्यवहार

या संग्रह वस्तू माणसाजवळ नसतील तर तो आई-वडिलाना मान देणार नाही. पंडीतजन या चार संग्रह वस्तूंचे स्मरण ठेवतात म्हणूनच ते स्तुतीला पात्र होतात.

**करिष (करिस) :–** प्राचीन काळात लांबी रुंदी मोजण्याचे हे माप होते. त्या काळात एक करिष आठ एकर च्या बरोबर होता. बुद्धदत्त महाथेरो यांनी एक करिष जवळ जवळ एक एकराचे बरोबर म्हटले आहे. सुवण्ण–कक्कर जातक आणि सालिकेदार जातकात एक हजार करिष (जवळ जवळ आठ हजार एकर) क्षेत्रफळ असलेल्या एका शेताचे वर्णन आहे. हे शेत राजगृहाच्या पूर्व अथवा उत्तर-पूर्व दिशेला सालिन्दिय नावाच्या ब्राह्मण ग्रामामध्ये होते.

**कल्प :–** म्हणजे एक कालमान आहे. कल्प चार आहेत. संवर्तकल्पं संवर्तस्थायी विवर्त आणि विवर्तस्थायी कल्प.

१. संवर्त कल्प म्हणजे प्रलय, हे तीन प्रकारचे आहेत. (अ) जलसंवर्त (ब) अग्नी संवर्त आणि (क) वायुसंवर्त.

२. विवर्तकल्प म्हणजे सृष्टी.

कल्पाचा विनाश करणाऱ्या मेहामेद्यांचा ज्वालानी नाश होईपर्यंत एक असंख्य संवर्त कल्प म्हटला जातो. कल्पाचा विनाश करणारी ज्वाला तिचा नाश होईपर्यंत दहा हजार चक्रवाल परिपूर्ण करणारा महामेघ उत्पन्न होईपर्यंत असंख्य संवर्तस्थायी कल्प म्हटला जातो.

महामेघ येऊन चंद्रसूर्य प्रगट होईपर्यंत असंख्य विवर्त कल्प म्हटला जातो. चंद्रसूर्य प्रगट झाल्यापासून तर कल्पाचा विनाश करणाऱ्या महामेघापर्यंतचा काळ असंख्य विवर्तस्थायी कल्प म्हटला जातो. अशा प्रकारे असंख्य कल्पाचा महाकल्प होतो.

चार कल्याणकारी गोष्टी– वाणीचा संयम, अल्पनिद्रा, अल्पआहार आणि एकाग्र चित्ताने धम्मश्रवण या चार गोष्टी कल्याणकारी आहेत.

चार प्रकारचे आहार– अन्न, स्पर्श, मनसंचेतना आणि विज्ञान असे चार प्रकारचे आहार आहेत.

**सत्यक्रिया :–** मानवी जीवनात सत्याला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. प्रत्येक माणूस तीन प्रकारचे कर्म करीत असतो.

(अ) शारीरिक कर्म (ब) वाचसिक कर्म आणि (क) मानसिक कर्म. हे तिन्ही प्रकारचे कर्म कुशल असले पाहिजे. मानवाचे कर्म सत्यावर आधारलेले असेल तरच ते कुशल होते. सत्यावर आधारलेले नसेल तर ते अशुद्ध, अपवित्र, अमंगल अथवा अकुशल होते. अशा कर्माचे फळ सुद्धा अशुद्ध, अपवित्र, अमंगल अथवा अकुशल असते. माणसाने आपले ध्येय प्राप्त करावयाचे असल्यास त्याचे प्रत्येक कर्म अथवा क्रिया

सत्यावर आधारलेले असले पाहिजे. त्यासाठी अधिष्ठानाची गरज असते. माणसाची प्रत्येक क्रिया सत्यावर आणि अधिष्ठानावर आधारलेली असली पाहिजे असे झाले तरच ती सत्य क्रिया म्हटली जाते.

**सम्बोधि—बोधि :**— परम ज्ञान अथवा श्रेष्ठ ज्ञान. बोधिसत्वाचे ध्येय सम्बोधि अथवा बोधि प्राप्त करणे हेच असते. बोधिसत्व शद्बाचा अर्थ बोधि अथवा सम्बोधि प्राप्तीसाठी प्रयत्न करणारा सत्व म्हणजे प्राणी. बोधिसत्व क्रमाने दहा पारमिता पूर्ण करून बोधि अथवा सम्बोधि प्राप्त करतो. बोधि अथवा सम्बोधि प्राप्त झालेला बोधिसत्व बुद्ध होतो.

**वङ्क पर्वत :**— वङ्क पर्वताला वेपुल्ल पर्वत असे नाव होते. इतिवुत्तक ग्रंथातील वेपुल्ल पब्बत सुत्तामध्ये हा गृध्रकूट पर्वताच्या उत्तरेकडे आहे असा उल्लेख आहे. संयुत्त निकायामध्ये या पर्वताचे प्राचीन नाव पाचीन वंस, वंकक पर्वत आणि सुपस्स पर्वत असे होते अशी माहिती मिळते. राजगृह नगर ज्या पांच पर्वतांनी वेढले होते त्याची नांवे पण्डव, गिज्झकूट, वेभार, इसिगिलि आणि वेपुल्ल पब्बत अशी होती. ही माहिती सुत्तनिपात ग्रंथावरील अट्ठकथेत सापडते. राजगृहाजवळ असलेल्या सर्व पर्वतामध्ये वेपुल्ल पर्वत सर्वात श्रेष्ठ आहे असे मिलिन्दपञ्ह या ग्रंथात म्हटले आहे. या पर्वतावर एक बौद्ध चैत्य होता. या ठिकाणी भगवान बुद्धाने उपदेश केला होता अशी माहिती सापडते. काही दिगंबर जैन साधू या पर्वतावर निवास करीत आणि तपस्या करीत होते अशी माहिती ह्यूएन-त्सांग या चीनी पंडिताने आपल्या प्रवास वर्णनात दिली आहे.

**चेतरट्ठं (चेदिराष्ट्र) :**— अङ्गुत्तर निकाय ग्रंथामध्ये प्राचीन भारतातील सोळा महाजनपदांची माहिती मिळते. ही राष्ट्रे खालील प्रकारची होती—

अंग, मगध, काझी, कोशल, वज्जी, मल्ल, चेति, वंस (वत्स) कुरु, पांचाल, मच्छ (मत्स्य), सूरसेन, अस्सक, अवन्ती, गन्धार आणि कम्बोज. भगवान बुद्धांनी चेति जनपदातील सहजाति नगरात विहार केला होता. चेति राज्याची राजधानी सोत्थिवति नगरी होती. बुद्धत्व प्राप्तीनंतर भगवान बुद्धांनी तेरावा वर्षावास चेति अथवा चेतिय राष्ट्रातील चालिय अथवा चालिक पर्वतावर केला होता. या पर्वताच्या जवळ जन्तुगाम आणि किमिकाला ही नदी होती. या राज्यात पारिलेय्यकवन प्रसिद्ध होते. सुरापान जातकातून माहिती मिळते की, एके वेळी भगवान बुद्ध चेति राष्ट्रातील भद्दवती अथवा भद्दवतिका नगरीतून कौशाम्बी नगरीला गेले होते. भद्दवती नगरीतून कौशाम्बीला जाणारा एक मार्ग होता. या दोन्ही नगरांमध्ये व्यापारी संबंध होते. महाराष्ट्र राज्यातील चंद्रपूर जिल्ह्यातील भांदक हे गाव बुद्धकालीन भद्दवती असले पाहिजे यात शंका नाही.

सुत्तनिपात ग्रंथावरील अट्ठकथेमध्ये म्हटले आहे की, चेति जनपदामध्ये ‘चेति’ अथवा ‘चेतिय’ नाव धारण करणाऱ्या राजांनी राज्य केले होते त्यामुळे या राष्ट्राचे ‘चेति’ असे नाव पडले.

□□

अनुक्रमणिका

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-६.

## अनुक्रमणिका